महाराष्ट्र राज्य शासनाच्या राज्यपत्रातील अधिसूचना क्रमांक UR T 1494 (149) 94/UNI-3 दिनांक ७ सप्टेंबर १९९४ अन्वये दिनांक १७ सप्टेंबर, १९९४ पासून प्रस्थापित व कार्यालयीन आदेश क्रमांक F-9-9/94 (CPP-I) दिनांक १९ मे, १९९८अन्वये विद्यापीठ अनुदान आयोगाची मान्यता प्राप्त स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा, विद्यापीठ, नांदेड संलग्न

## शिव छत्रपती शिक्षण संस्थेचे

# राजर्षी शाहू महाविद्यालय, लातूर

## (स्वायत्त)

शिव छत्रपती शिक्षण संस्था लातूर
॥ आरोह तमसो ज्योतिः ॥
स्थापना १९७०

### (कला, वाणिज्य, विज्ञान, जैवतंत्रज्ञान व माहिती तंत्रज्ञान)

**NAAC Reaccredited - 'A' Grade with 3.38 CGPA**
**CPE(Phase-III) Status Granted by U.G.C.**
**FIST Support by DST, Govt. of India**
**Best College Award (Urban) by SRTM University, Nanded**
**ISO 9001:2008 (QMS)Certfication**

'A' grade in Academic Audit by SRTM University, Nanded
Acquired Rank in Rank Band 101-150 Under NIRF, MHRD, Govt.of India



# माहिती पुस्तिका
# वरिष्ठ महाविद्यालय,
# २०१८-१९

# शिव छत्रपती शिक्षण संस्था, लातूर

## कार्यकारी मंडळ

| अ.क्र. | नांव | पद |
|---|---|---|
| १ | डॉ.गोपाळराव विठ्ठलराव पाटील | अध्यक्ष |
| २ | डॉ. पंढरीनाथ रावसाहेब देशमुख | उपाध्यक्ष |
| ३ | प्राचार्य अनिरुध्द साहेबराव जाधव | सचिव |
| ४ | ॲड. किशनराव भाऊराव सोनवणे | सहसचिव |
| ५ | श्री. गोपाळ गोविंदराव शिंदे | सहसचिव |
| ६ | ॲड. शहाजी तुळशीराम मनाळे | सदस्य |
| ७ | प्रा.मधुकर सिताराम देशमुख | सदस्य |
| ८ | डॉ. शिवाजीराव हरिश्चंद्र सुर्यवंशी | सदस्य |
| ९ | श्री. निवृत्ती रावणराव देशमुख | सदस्य |
| १० | डॉ. रावसाहेब लिंबराज कावळे | सदस्य |
| ११ | श्री. भैरवनाथ भगवानराव ठोंबरे | सदस्य |
| १२ | डॉ. शेखर नारायणराव गरड | सदस्य |
| १३ | श्री. आनंद नागोराव माने | सदस्य |
| १४ | डॉ. सुहास विष्णुपंत गोरे | सदस्य |
| १५ | श्री. महादेव शहाजीराव मुळे | सदस्य |
| १६ | ॲड. सुनिल किशनराव सोनवणे | निमंत्रीत सदस्य |
| १७ | डॉ. सतिश पंढरीनाथ देशमुख | निमंत्रीत सदस्य |
| १८ | श्री. बब्रुवान किशनराव गोमसाळे | निमंत्रीत सदस्य |
| १९ | आ. दिलीपराव दगडोजीराव देशमुख | सदस्य |

# शैक्षणिक समन्वय समिती

महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचे शैक्षणिक प्रश्न, अडीअडचणी सोडवण्यासाठी खालील शैक्षणिक समन्वय समिती कार्यरत आहे :

१. प्रा.बी.बी. सानप : अध्यक्ष - ९४२१४५३५९६
२. डॉ. एस.जे. कुलकर्णी : वाणिज्य शाखा - ९४२१५५४७००
३. प्रा.के.आय. मोमीन : विज्ञान शाखा - ९४२३३५२११०
४. प्रा. व्ही.जे. दळवी : कला शाखा - ९४०३२४५६६९

# प्राचार्यांचे मनोगत



**प्रिय विद्यार्थी मित्र व पालक बंधु-भगिन नो,**

**२०१८-२०१९ या शैक्षणिक वर्षात सर्व विद्यार्थ्यांचे मन:पूर्वक स्वागत!** या महाविद्यालयाची वाटचाल अत्यंत प्रतिकूल परिस्थीतितून झालेली आहे. महाविद्यालयाचे बोधचिन्ह **फिनिक्स पक्षी** असून या पक्षाच्या संकल्पनेप्रमाणे महाविद्यालयाने आपल्या ध्येयपूर्तीसाठी अथक परिश्रम केलेले आहेत. **१९७०** च्या स्थापनेपासून शिक्षणाचा सामाजिक संदर्भ आणि आशय लक्षात घेवून विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण व्यक्तीमत्वाचा विकास घडविण्याच्या कामी हे महाविद्यालय नेहमीच अग्रेसर राहिलेले आहे.

शैक्षणिक मुल्यांची जोपासना आणि **'उत्कृष्टतेचा ध्यास' (Pursuit of Excellence)** हा ध्येयवाद सुरूवाती पासून संस्थेचे अध्यक्ष व आमचे प्रेरणास्थान असलेले **मा.डॉ.गोपाळराव पाटील** यांच्या मार्गदर्शनाखाली या संस्थेने बाळगलेला आहे.

महाविद्यालयाने गुणात्मक विकास साध्य करून कनिष्ठ व वरिष्ठ वर्गाचे निकाल गेल्या अनेक वर्षापासून सर्वाधिक लावून मराठवाड्यात नव्हे तर महाराष्ट्रात एक नवा विक्रम प्रस्थापित केला आहे. केवळ शैक्षणिक उपक्रमांनाच प्राधान्य न देता सामाजिक परिवर्तनाची प्रक्रिया गतिमान करण्यातही आपले महाविद्यालय अग्रेसर राहिले आहे.

महाविद्यालयामध्ये कला, वाणिज्य, विज्ञान, जैवतंत्रज्ञान, संगणकशास्त्र व उपयोजित संगणकशास्त्र पदवी अभ्यासक्रमा बरोबरच पदव्युत्तर स्तरावर संस्कृत, अर्थशास्त्र, इंग्रजी, राज्यशास्त्र, भूगोल, वाणिज्य, संगणकशास्त्र, जैवतंत्रज्ञान, भौतिकशास्त्र **(Photonics),** रसायनशास्त्र, वनस्पतीशास्त्र, गणित तसेच एम.फिल्. भूगोल व MCJ या अभ्यासक्रमाची सोय उपलब्ध करून देण्यात आलेली आहे. तसेच पदवी स्तरावर **NCC Studies** व पत्रकारीता MCJ (Mass Communication and Journalism) सारखे अंतर विद्याशाखीय विषय सुरु करण्यात आलेले आहेत. बी.ए., बी.कॉम. व बी.एस्सी. प्रथम व द्वितीय वर्षासाठी संभाषण इंग्रजी अनिवार्य व बी.ए. प्रथम वर्षासाठी भारतीय राज्यघटना हे विषय अनिवार्य विषय म्हणून व ब्युटिशियन, GIS, सुगम संगीत सर्टिफिकेट कोर्स सुरु करण्यात आलेले आहेत. पदवी प्रथम वर्षासाठी मुल्यशिक्षण अभ्यासक्रम तसेच पदवी तृतीय वर्षासाठी संशोधन प्रकल्प व पर्यावरण अभ्यासक्रम अनिवार्य करण्यात आलेले आहेत.

राष्ट्रीय पातळीवरील **केंद्रीय लोकसेवा आयोग (UPSC) व महाराष्ट्र राज्य लोक सेवा आयोग (MPSC)** मार्फत घेण्यात येणाया स्पर्धा परीक्षेत आमचे विद्यार्थी अग्रेसर राहावेत म्हणून **राजर्षी शाहू प्रबोधिनी** तर्फे विविध स्पर्धात्मक परीक्षांचे वर्ग नियमित चालविले जातात. यासाठी गेल्या दोन शैक्षणिक वर्षापासून एक स्वतंत्र **बी.ए. (MPSC Special Batch)** ची तुकडी सुरु करण्यात आलेली आहे.

महाविद्यालयाचे सर्व आवश्यक भौतिक सुविधांनीयुक्त, सुसज्य असे एकुण चार स्वतंत्र शैक्षणिक संकुल आहेत. त्यात कला-वाणिज्य कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालय, विज्ञान कनिष्ठ महाविद्यालय, जैवतंत्रज्ञान विभाग व स्वतंत्र क्रिडा संकुल यांचा समावेश आहे.

महाराष्ट्राच्या काना कोपयातून येणाया गरीब ग्रामीण विद्यार्थ्यांना राहण्यासाठी र ा शैक्षणिक संकुलांच्या परिसरातच वस्तीगृहांची सोय करण्यात आलेली आहे. त्यात सर्व अद्ययावत सोय नीयुक्त मुल चे व मुलांचे वसतीगृह वरिष्ठ महाविद्यालयात कार्यरत आहे.

**ग्रंथालय हेच आजचे विश्वविद्यालय आहे** या तत्वाला अनुसरून ग्रंथसंपदेने सुसज्य व **OPAC** सोयींनीयुक्त असे संगणकीकृत ग्रंथालय महाविद्यालयात कार्यरत आहे. अत्याधुनिक संगणकीय प्रणालीने **Online** माहिती सेवा घेण्यासाठी **N-List** व **DELNET या Consortia** द्वारे असंख्य **E-Books** व **E-Journals** ची सोय करण्यात आलेली आहे. एकूण ११६५ ग्रंथांची एक **डिजीटल ऑडीओ लायब्ररी** ची स्थापना कारण्यात आलेली आहे. आधुनिक SOUL व Green Stone सॉफ्टवेअर उपलब्ध करुन देण्यात आलेले आहेत.

आमचे महाविद्यालय विद्यापीठ पातळीवरच नव्हे तर मराठवाडा पातळीवर **स्वायत्तता स्वीकारणारे पहीले व एकमेव महाविद्यालय आहे.** महाविद्यालयाने **स्वायत्त** दर्जा मिळवून एका नव्या पर्वाला सुरुवात केली आहे. शैक्षणिक स्वायत्ततेमुळे सर्व शाखांचा अभ्यासक्रम स्वत:च्या अभ्यासमंडळातील तज्ञ व्यक्तीकडून तयार करणे, शैक्षणिक दिनदर्शिका राबवणे, प्रवेशाचे निकष ठरवणे, परीक्षेचे नियोजन करणे, परीक्षा वेळेवर घेवून **श्रेयांक पध्दती (Credit Based System)** ने विद्यार्थ्यांचे मुल्यमापन करणे व वेळेवर निकाल लावणे ही कामे महाविद्यालय पातळीवर अत्यंत काटेकोरपणे केली जातात. यामुळे काळाशी सुसंगत, रोजगाराभिमुक अभ्यासक्रम तयार करण्यावर भर देण्यात आलेला आहे. जेणे करून कार्य संस्कृती रुजावी, क्रियाशिलता वाढावी आणि रोजगाराच्या अधिकाधिक संधी प्राप्त व्हाव्यात या बाब ना प्राधान्य देण्यात आले आहे. **विविध प्रकल्प, सेमिनार्स व ॲड-ऑन कोर्सेस** ही सुरू करण्यात आलेले आहेत. स्वायत्ततेमुळे परीक्षा मुल्यांकनाच्या सर्व पध्दतीत अमुलाग्र बदल झालेले आहेत. मागील शैक्षणिक वर्षापासून सर्व शाखेतील पदवी व पदव्यूत्तर अभ्यासक्रमांना **CBCS** प्रणालीसह सेमीस्टर पध्दती लागू करण्यात येत आहे. या प्रणाली अंतर्गत **Core Courses** सोबत **AECC, SEC** व **DSEC** कोर्सेसचा समावेश राहणार आहे.

मुल्यमापन केलेल्या उत्तरपत्रिका विद्यार्थ्यांना दाखवुन परीक्षा पध्दतीत मोठ्याप्रमाणात पारदर्शकता आणल्यामुळे मुल्यांकन पध्दतीवरील विद्यार्थ्यांचा विश्वास वाढण्यास मदत झाली आहे. श्रेयांक पध्दतीमुळे विद्यार्थी अधिक बहुश्रुत होण्यास मदत झाली आहे. विद्यार्थ्यांना त्यांच्या **वर्गातील उपस्थितीबद्दल १० टक्के गुण** ठेवल्यामुळे त्यांच्या उपस्थितीत लक्षणिय वाढ झाली आहे. स्वायत्तता स्वीकारूनही, महाविद्यालयाने परीक्षेतील दैदिप्यमान यशाची परंपरा कायम राखली आहे. स्वायत्ततेच्या यशाची फळे महाविद्यालयास प्राप्त झोलेली आहेत. **याचीच एक फलश्रुती म्हणजेच या वर्षाचे उज्वल निकाल होय.** या वर्षीच्या परीक्षेमध्ये **O Grade** (विशेष प्राविण्यासह प्रथम श्रेणी) घेवून अंतिम वर्ष बी.ए.चे **०७,** बी.कॉम चे **२२,** बी.एस्सी.जनरल चे **०७,** बी.एस्सी.सी.एस.चे **३९,** बी.सी.ए.चे **२४,** बी.एस्सी.बी.टी.चे **११,** एम.ए.भूगोल चे **०९,** एम.ए.अर्थशास्त्र **०२,** एम.ए.संस्कृत चे **०२,** एम.कॉम.चे **०९,** एम.एस्सी. बी.टी.चे **०४,** एम.एस्सी. सी.एस.चे **०७,** एम.एस्सी फिजीक्स चे **०७** आणि एम.एस्सी रसायन शास्त्राचे **१७** विद्यार्थी उतीर्ण झालेले आहेत, ही अभिमानाची व स्वागतार्ह बाब आहे.

विद्यार्थ्यांना रोजगाराभिमुख शिक्षण देण्याचा महाविद्यालयचा प्रयत्न राहणार आहे. त्याअनुषंगाने स्वतंत्र **प्लेसमेंट सेल** ची निर्मिती करण्यात आलेली आहे. त्या साठी प्लेसमेंट ऑफीसरची नियुक्ती करण्यात आलेली आहे. या प्लेसमेंट सेल द्वारे बाहेरील नामांकित बहुराष्ट्रीय कंपन्यामार्फत **कॅम्पस इंटरव्ह्युव** घेतले जात आहेत. शैक्षणिक वर्ष २०१७-१८ मध्ये **ICICI, Axis, HDFC, Finopay Tech** बँक व **Getwgic, Digishell, Wipro, TCS, Coxms** या माहितीतंत्रज्ञान क्षेत्रातील कंपनीद्वारा आयोजित कॅम्पस् इंटरव्ह्यूमध्ये एकूण १९८ विद्यार्थ्यांची तसेच मागील पाच वर्षामध्ये एकूण ४५८ विद्यार्थ्यांची नियुक्ती झालेली आहे. **स्वायत्ततेमुळे गुणात्मक शैक्षणिक दर्जापेक्षा रोजगाराभिमुख शैक्षणिक दर्जेला महत्व देण्यात आलेले आहे. प्लेसमेंट सेलद्वारे Our Recruiters ची स्वतंत्र यादी जाहीर करण्यात आलेली आहे.**

महाविद्यालयाचे असंख्य माजी विद्यार्थी यशस्वी नागरिक म्हणून समाजामध्ये वावरत आहेत. त्यामध्ये शासकीय सेवेतील अधिकारी, यशस्वी उद्योजक, डॉक्टर्स, इंजिनिअर्स, वकील, न्यायाधीश, राजकीय नेते व बहुराष्ट्रीय कंपन्यामध्ये अधिकारी व सामाजिक कार्यकर्ते यांचा समावेश आहे.

आमच्या महाविद्यालयचा क्रिडा, सांस्कृतिक, वाद-विवाद, वक्तृत्व स्पर्धा व अन्य क्षेत्रातील विद्यापीठ पातळीवरील दबदबा कायम राहीला आहे. सामाजिक क्षेत्रात राष्ट्रीय सेवा योजना, विवेक वाहिनी व अंधश्रध्दा निर्मुलनाच्या माध्यमातून सामाजिक कार्यात आम्ही आघाडीवर आहोत. स्वायत्ततेचे हे आम्ही मोठे यश समजतो. मुख्य म्हणजे विद्यार्थ्यांचा शैक्षणिक यशाचा आलेख चढताच राहीला आहे.

सर्व उपक्रम राबविण्यात एक शैक्षणिक सहजता असते. महाविद्यालयात नेहमीच चैतन्यांने भरलेले वातावरण असते. विविध विषयांच्या विद्यार्थी पुरस्कृत अभ्यास मंडळाद्वारे विद्यार्थी केंद्रित शैक्षणिक व सांस्कृतिक उपक्रमातील सातत्यांमुळे शैक्षणिक वर्ष गजबजलेले असते. मागील पाच वर्षातील **स्वायत्त महाविद्यालयाचा उज्वल निकाल व रोजगाराभिमुख शिक्षण व्यवस्थेने त्याचा कळसाध्याय लिहीला गेला इतकेच.** विद्यार्थांना केवळ पुस्तकी ज्ञान नव्हे तर जीवनात प्रत्यक्ष पावले टाकायला शिकवणारे **निष्ठावंत शिक्षकांमुळेच** महाविद्यालयाला स्वायत्तता स्वीकारता आली.

प्रास्तावीक लिहीत असतांना संकल्प सिध्दीस गेल्याचा आनंद तर आहेच, शिवाय जे कमावले ते येथून पुढे नुसते टिकवायचेच नाही तर वाढवायचेही आहे, या जबाबदारीचीही जाणीव आहे. **'यशासारखे दूसरे फक्त यशच असते'** या जाणीवेतूनच महाविद्यालयाची वाटचाल राहीलेली आहे. विविध विषयातल्या बीजप्रश्नांची उकल करणारी चर्चासत्रे व परिसंवाद हे आमचे सुपरिचीत वैशिष्ट्ये आहेत.

भारतीय शिक्षण व्यवस्थेत सकारात्मक बदल घडवून आणण्यासाठी **विज्ञान-तंत्रज्ञान आधाराच्या** बळावर **Internet व ICT** सारख्या अध्ययन **अध्यापनाची साधने वापरून अध्यापन केंद्रित शिक्षणा पेक्षा अध्ययन केंद्रित शिक्षण (Learning Emphasised Education Rather Than Teaching Emphasised Education)** अवलंबणे गरजेचे आहे. त्याच बरोबर **काल सुसंगत कौशल्य कोणती आहेत** हे ओळखणे गरजेचे असते. **आधुनिक काळात एकच कौशल्य आयुष्यभर टिकेल याची खात्री देता येत नाही. त्यामुळे बहूकौशल्य विकास हे एक उदिष्ट् डोळ्यासमोर ठेवून प्रयत्न करण्याची गरज आहे**. या दिशेने निश्चय पुर्वक प्रयत्न करावा लागेल. **तरच येणाया नजीकच्या काळात विकसनशील देशाच्या रांगेतून आपले भारत राष्ट्र निश्चितच विकसित देशांच्या रांगेत जावून बसण्याची अपेक्षा आपण करू शकतो.**

**व्यक्ती सुशिक्षित आहे म्हणजे सुसंस्कारित आहे असे होत नाही. सद्य स्थितीत देशाला सुशिक्षित नागरिकांबरोबरच सुसंस्कारित नागरिकांची गरज आहे.**

विज्ञान व तंत्रज्ञानामुळे मानवी जीवनात अमुलाग्र बदल दिसून येत आहेत. अलिकडच्या दशकामध्ये विज्ञानाची प्रगती झपाट्याने होत आहे. संगणकशास्त्र माहिती तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात **Quantum Computing** संकल्पनेतून साकारलेल्या अतिउच्च संगणकीय क्षमतेचे माइक्रो प्रोसेसरवर आधारित **Quantum Super Computers** येत आहेत. भावी काळात संगणकीय क्षेत्राची वाटचाल **Neuro Morphic Computers** च्या निर्मिती कडे राहणार आहे, हे निश्चित. याचाच एक भाग म्हणजे कृत्रिम बुद्धिमत्ता (Artificial Intelligengce) होय. याद्वारे अद्ययावत रोबो यंत्र मानव निर्माण होऊन भविष्यात कृत्रिम बुद्धिमत्ता ही मानवीय बुद्धिमत्तेवर मात करण्याची शक्यता नाकारता येत नाही.

आज जगात संशोधनाला अत्यंत महत्व प्राप्त झालेला आहे. त्यात नाविन्यपूर्ण संशोधन होणे गरजेचे आहे. शिक्षणातील सैध्दांतिक मांडणीवरील आधारित पध्दती बदलून त्याजागी प्रात्यक्षिकांमधून शिकण्याची पध्दतीवर भर दिला जात आहे. सौर ऊर्जा क्षेत्रातील संशोधनामुळे अतिसुक्ष्म कॉंटम डॉट त्रिमितीय सोलार सेल यांची कार्यक्षमता ७०% पेक्षा अधिक होऊन सोलार सेल हे विद्युत ऊर्जा निर्माण करणारे व साठविणारे असे सेल्फ पॉवरिंग डिवाईस म्हणून कार्य केल्यामुळे ऊर्जा प्रश्न मार्गी लागणार आहे. फ्लोरस्सेन्स प्रथिनेयुक्त **'नॅनोस्कोप'** च्या शोधामुळे मानवी मेंदूतील पेश चे कार्य प्रत्यक्ष पाहता आल्याने मेंदूची कार्यप्रणाली समजून घेण्यास मदत होणार आहे. ग्राफीन पेक्षाही अधीक वैशिष्ट्यपूर्ण 2D मटेरीअल निर्माण होत आहे. अलिकडे शास्त्रज्ञांनी रुबिडियम मुलद्रव्याच्या अणुंच्या Bose Einstein Condensate अवस्थेतून विचित्र गुणधर्माचा ऋण वस्तूमानाचा प्रवाही पदार्थ बनविला आहे.

आमचे विद्यार्थी शैक्षणिक व विज्ञान-तंत्रज्ञान क्षेत्रात होणाया नव्या घडामोडींची नों द घेवून आपले ज्ञान समृध्द करून यशस्वी जीवनाचे मार्ग सुकर करतील!

**महाविद्यालयात प्रवेश मिळविलेले विद्यार्थी या संधीचा फायदा घेऊन आपले बहुकौशल्य विकासाचे ध्येय साध्य करून घेतील अशी मला अपेक्षा आहे.**

**धन्यवाद !**

**(डॉ.एस.डी.साळुंके)**
**प्राचार्य**

## Vision :

- Pursuit of excellence in higher education to make our students globally competent with humane values.

## Mission :

- Enable students to develop as responsible citizens.
- Provide value and need based education.
- Mould minds of students for their continuous personal and professional growth.

## Objectives :

- Produce graduates capable of independent life long learning.
- Provide an environment in which staff and students can achieve their full potential.
- Foster a strong sense of belonging to the institution.

# महाविद्यालयाची ठळक वैशिष्ठ्ये

**प्रिय विद्यार्थी मित्र व पालक बंधु-भगिनींनो,**

आज शिक्षणक्षेत्रात महाविद्यालयाची संख्या वाढत आहे, परंतू गुणात्मक दर्जा समाधानकारक नाही. म्हणून शिक्षणक्षेत्रात कांही निश्चित आव्हाने उभी आहेत. या आव्हानास केवळ सामोरे न जाता ती स्वीकारून आमच्या महाविद्यायाने गेल्या ४८ वर्षांच्या काळात गुणात्मक दर्जा निर्माण केला आहे. गुणात्मक विकास साध्य करण्यासाठी आमचे महाविद्यालय सतत अग्रेसर राहत आलेले आहे. संख्यात्मक विकासापेक्षा गुणात्मक विकासाला अग्रक्रम दिल्यामुळे महाराष्ट्रातील आणि महाराष्ट्रा बाहेरील विद्यार्थी प्रवेशासाठी आमच्या महाविद्यायाची निवड करीत आहेत. परंतू सर्व विद्यार्थ्यांना प्रवेश मिळू शकत नाही याची खंत आम्हास होत आहे. महाविद्यालयाचे संस्थाचालक, प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी, सेवक आणि विद्यार्थी यांनी जे शैक्षणिक प्रयोग राबविले याला **'शाहू पॅटर्न'** व पुढे जावून यालाच **'लातूर पॅटर्न'** या नावाने आज ओळखले जात आहे. केवळ महाराष्ट्राच्याच नव्हे तर शेजारील राज्यांच्या विविध भागातील संस्थापक, प्राचार्य आणि प्राध्यापक या पॅटर्न चे अनुकरण करण्याच्या दृष्टीने येथील विविध उपक्रमांचे अवलोकन करण्यासाठी सातत्याने भेटी देत आहेत.

विद्यार्थ्यांच्या व्यक्तीमत्वाचा सर्वांगीण विकास व्हावा व त्या बरोबरच त्यांच्यावर चांगले संस्कार करून तो उद्याचा आदर्श नागरीक बनावा ही आमची धडपड आहे. आमच्या असंख्य विद्यार्थ्यांनी गरीब रुग्णांना रक्तदान देवून तसेच आत्महत्याग्रसत शेतकयांना आर्थिक मदत करुन सामाजिक जाणीव प्रगल्भ केलेली आहे.

महाविद्यालयाच्या परिसरात व्यसनमुक्ती अभियानांतर्गत धुम्रपान, तंबाखू सेवन व मोबाईलच्या गैरवापरावर पूर्णपणे बंदी घालण्यात आलेली आहे. महाविद्यालयाचा विद्यार्थी हा प्रज्ञावंत,गुणवंत, शिलवंत व व्यसनमुक्त असावा असा आग्रह असल्याने व्यसनमुक्तीच्या या मोहिमेत सर्व विद्यार्थी स्वंयस्फुर्तीने सक्रिय सहभाग नोंदवत आहेत. याबद्दल मला रास्त अभिमान वाटतो. शिस्तीचे आणि समतेचे प्रतीक म्हणून महाविद्यालयातील सर्व विद्यार्थी, अध्यापक व कर्मचारी यांनी गणवेश स्वीकारलेला आहे.

या स्पर्धेच्या जगात आमचा विद्यार्थी कमी पडू नये तसेच त्याच्या मनातील न्युनगंड कमी करून त्याच्या व्यक्तीमत्वाची जडण-घडण करण्यासाठी संस्थाचालक व अध्यापकांचे प्रयत्न सुरु आहेत.

विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास ही सेवाभावी वृती स्वीकारुन अनेक उपक्रम महाविद्यालयात सातत्याने राबविले जात आहेत. शिक्षण प्रक्रियेत विद्यार्थी हा केंद्रबिंदु असल्यामुळे, त्यांच्या सर्वांगीण विकासासाठी तसेच त्यांच्या अंगी असेलेल्या सुप्त गुणांचा विकास करण्यासाठी महाविद्यालयात गुणवत्ता विकास योजना, डॉ. बाबासाहेब आंबेडकर वाचन स्पर्धा, महात्मा ज्योतिबा फुले लेखन स्पर्धा, राष्ट्रीय छात्र सेना, राष्ट्रीय सेवा योजना, क्रिडा, सांस्कृतिक मंडळ, वाङःमय मंडळ, वाद-विवाद व वक्तृत्व मंडळ, अविष्कार, शाहू प्रबोधिनी, विविध विषयाचे अभ्यास मंडळ, वाणिज्य मंडळ, कॉमर्स आयडॉल, विज्ञान मंडळ, सामाजिक शास्त्र मंडळ, शब्दगंध व मुक्त विद्यापीठाचे विविध उपक्रम, विवेक वाहिनी, अ. नि. स. अंतर्गत उपक्रम व व्यक्तीमत्व विकास कार्यशाळा उपक्रम प्रभावीपणे राबविले जातात.

ग्रामीण भागातून शिक्षणाचा प्रसार व प्रचार करण्याच्या मोठ्या ध्येयवादाने महाविद्यालयात शेतकरी, शेत मजूर, गरीब होतकरू व आर्थिक दृष्ट्या कमकुवत विद्यार्थ्यांना आपले स्वतःचे शिक्षण यशस्वीरित्या पूर्ण करता यावे यासाठी **कर्मवीर ॲड. नारायणराव पाटील विद्यार्थी सहाय्य निधीतून शिष्यवृत्ती योजना, प्राचार्य अनिरूध्द जाधव कमवा व शिका योजना, आणि प्राचार्य डॉ. आर एल. कावळे अनाथ विद्यार्थी दत्तक योजना** राबविल्या जातात.

महाविद्यालयाला निष्ठावंत शिक्षक वृंद लाभलेला आहे. एकूण **१२९ प्राध्यापकापैकी ३४ प्राध्यापक पीएच.डी./एम.फिल. धारक व २८ शिक्षक संशोधन मार्गदर्शक** आहेत. तसेच जैवतंत्रज्ञान विभागातील **सर्व प्राध्यापकांना** विद्यार्थ्यांच्या कौशल्य विकास व प्रशिक्षण कार्यासाठी **NSQF** अंतर्गत **नवी दिल्ली येथील National Skill Development Corporation** तर्फे मान्यता प्राप्त झालेली आहे हे विशेष.

महाविद्यालयातील पाच विद्याशाखे अंतर्गत एकुण **२५ विविध विभाग कार्यरत** आहेत. विद्यापीठ मान्यता प्राप्त एकुण **७ संशोधन केंद्रामार्फत महाविद्यालयातील संशोधन कार्य** प्रगतिपथावर आहे. याचीच एक फलश्रुती म्हणून **उच्च इंपॅक्ट फॅक्टर** असलेल्या राष्ट्रीय-अंतरराष्ट्रीय शोध पत्रिका नियतकालिकेत आमच्या संशोधक विद्यार्थी व प्राध्यापकांच्या शोध पत्रिका प्रकाशित झालेल्या आहेत. महाविद्यालयातील एका शिक्षकाला **हळदी प्रकियेवरील पेटेंट** प्राप्त झालेले आहे. विविध संशोधन केंद्रात कार्यरत एकूण **२८ संशोधक मार्गदशकांच्या** मार्गदर्शनाखाली **४५ पीएच.डी.संशोधक** व **६० एम.फिल्. संशोधक** संशोधन कार्य करीत आहेत. आतापर्यत एकूण **५५ पीएच.डी.पदवीधर** व **६५ एम.फिल्. पदवीधर** महाविद्यालयाने निर्माण केले आहेत.

जागतिकीकरणाच्या शतकात आमचे विद्यार्थी स्पर्धेत राहावेत म्हणून आपल्या महाविद्यालयाने राष्ट्रीय व जागतिक पातळीवरील नामांकित संस्था व विद्यापीठांशी **सामंजस्य करार** केलेले असून या द्वारे महाविद्यालयाच्या अनेक विद्यार्थ्यांना संशोधनाच्या संधी प्राप्त झालेल्या आहेत. सदरील करारांतर्गत **NCL पूणे**, **फ्रांस येथील लिल्-१ विद्यापीठामध्ये** आमचे विद्यार्थी संशोधनाचा लाभ घेत आहेत. **कॅनडा** येथील **यॉर्क विद्यापीठाशी** सामंजस्य करार प्रक्रिया करण्याचा संकल्प सोडला आहे.

महाविद्यालयाला स्वा.रा.ती.म. विद्यापीठाचा **उत्कृष्ट महाविद्यालय (शहरी) पुरस्कार** प्राप्त झालेला आहे. **नॅक (NAAC)** ने दूसया मुल्यांकनात **3.38 CGPA** सह **'A' Grade ('अ' श्रेणी )** बहाल करून **'शाहू'** च्या शिरपेचात आणखी एक मानाचा तूरा खोवला आहे. त्याच बरोबर **UGC** ने प्रदान केलेल्या **CPE-Phase-3** दर्जेचाही आम्हास रास्त अभिमान आहे.

विज्ञान शाखेतील एकूण सहा विविध विभागांच्या भौतिक सुविधांच्या विकासासाठी, **भारत सरकारच्या विज्ञानतंत्रज्ञान मंत्रालयांतर्गत विज्ञानतंत्रज्ञान विभागातर्फे** दिल्या जाणाया **DST-FIST** योजनेचीही महाविद्यालयाच्या शैक्षणिक प्रगतीत भर पडलेली आहे. गेल्या शैक्षणिक वर्षात **ISO 9001:2008 (QMS) Certification** महाविद्यालयाला प्राप्त झाल्याने कार्यालयीन, विविध विभागातील प्रशासकीय व्यवस्थापन प्रणाली अंतरराष्ट्रीय दर्जेची असल्याचे शिक्कामोर्तब झाले आहे. **महाविद्यालयाने नॅक मुल्यांकनाची तृतीय मानांकन (NAAC 3rd Cycle Accreditation) प्रक्रिया यशस्वीपणे पूर्ण केलेली आहे.**

Z महाविद्यालयातील ९ शिक्षक व ३६१ विद्यार्थ्यांचा IIT तर्फे चालविल्या जाणाया NPTEL कोर्सेसमध्ये सहभाग.

Z केंद्र शासन मानव संसाधन विकास मंत्रालयाद्वारे घेण्यात आलेल्या NIRF-2017 रॅंकिंग प्रक्रियेमध्ये महाविद्यालयाला भारतातील गुणवत्ताधारक पहिल्या १०१-१५० Rank Band मध्ये स्थान प्राप्त.

Z स्वा.रा.तीर्थ मराठवाडा विद्यापीठाने केलेल्या Acadamic Audit मध्ये महाविद्यालयाला ४०० पैकी ३९२ गुणासह 'अ' दर्जा प्राप्त.

गुणवत्ता व विद्यार्थ्यांच्या सर्वागिण विकासासाठी कटीबध्द असलेल्या या महाविद्यालयात प्रवेश मिळालेल्या सर्व विद्यार्थ्यांनी महाविद्यालयाच्या विविध उपक्रमात सक्रिय सहभाग नोंदवून आपला सर्वांगिण विकास करून आपले ध्येय साध्य करावे. तसेच महाविद्यालयाची शिस्तीची व गुणवत्तेची परंपरा कायम राखवी.

धन्यवाद.

**(डॉ.एस.डी.साळुंके)**
**प्राचार्य**

## पदवी प्रथम वर्ष प्रवेश मर्यादा

## UG First Year Intake Capacity

| | | | |
|---|---|---|---|
| 01. | B.A. F.Y. (बी.ए. प्रथम वर्ष) | - | 320 |
| 02. | B.Com. F. Y. (बी. कॉम. प्रथम वर्ष) | - | 320 |
| 03. | B.Sc. F. Y. (बी. एस्सी. प्रथम वर्ष) | - | 220 |
| 04. | B.Voc. Computer Technology F. Y. (बी. व्होक. कॉम्प्युटर टेक्नॉलॉजी प्रथम वर्ष) | - | 50 |

## पदव्युत्तर प्रथम वर्ष प्रवेश मर्यादा

## PG First Year Intake Capacity

| | | | |
|---|---|---|---|
| 01. | M. A. Geography (एम.ए. भूगोल) | - | 60 |
| 02. | M. A. Economics (एम.ए. अर्थशास्त्र) | - | 60 |
| 03. | M. A. English (एम.ए. इंग्रजी) | - | 60 |
| 04. | M. A. Political Science (एम.ए. राज्यशास्त्र) | - | 60 |
| 05. | M.A. MCJ (एम.ए.जनसंज्ञापन आणि वृत्तपत्रविद्या) | - | 30 |
| 06. | M. Com. (एम. कॉम.) | - | 60 |
| 07. | M.Sc. Physics (एम.एस्सी. भौतिकशास्त्र) | - | 30 |
| 08. | M. Sc. Chemistry (एम.एस्सी. रसायनशास्त्र) | - | 30 |
| 09. | M. Sc. Mathematics (एम.एस्सी. गणित) | - | 30 |
| 10. | M. Sc. Botany (एम.एस्सी. वनस्पतीशास्त्र) | - | 30 |

## शैक्षणिक कार्यक्रम दिनदर्शिका

## शैक्षणिक नियोजन (२०१८-१९)

**प्रथम सत्र : २२ जून, २०१८ ते ०३ नोव्हेंबर, २०१८**

१) नोंदणी व प्रवेश (Tentative) :
अ) पदवी - प्रथम, द्वितीय, तृतीय वर्ष व पदव्युत्तर द्वितीय वर्ष : ०९ जून ते १९ जून, २०१८ पर्यंत
ब) पदव्युत्तर पदवी प्रथम वर्ष : पदवी निकालानंतर पूढील एक आठवड्या पर्यंत

२) नियमित वर्ग (Tentative) :
पदवी - प्रथम, द्वितीय, तृतीय वर्ष व पदव्युत्तर द्वितीय वर्ष : २५ जून,२०१८ पासून
पदव्युत्तर पदवी प्रथम वर्ष - २८ जून, २०१८ पासून

३) विद्यार्थी परिषद व विविध मंडळाची स्थापना : १२ सप्टेबर, २०१८ पर्यंत

४) शैक्षणिक जाणीव जागृती सप्ताह : १४ सप्टेंबर ते १८ सप्टेंबर, २०१८

५) विद्यार्थी परिषद उद्घाटन : १५ ऑक्टोबर, २०१८ पर्यंत

६) अभ्यासक्रम पूर्ण करणे (प्रथम सत्र) : ०३ ऑक्टोबर, २०१८ पर्यंत

७) सत्रांत प्रात्यक्षिक परीक्षा (प्रथम सत्र) : १२ ऑक्टोबर ते २२ ऑक्टोबर, २०१८

८) सत्रांत परीक्षा (प्रथम सत्र) : २३ ऑक्टोबर ते ०३ नोव्हेंबर, २०१८

९) सत्रांत परीक्षा निकाल (प्रथम सत्र) : १७ डिसेंबर, २०१८

---

**हिवाळी सुट्टी : ०४ नोव्हेंबर, २०१८ ते २८ नोव्हेंबर, २०१८**

**दिपावली सुट्टीतील उपक्रम :**

अ) शैक्षणिक सहलींचे आयोजन
ब) एन.सी.सी. कॅम्प चे आयोजन
क) एन.एस.एस. निवासी शिबीर

---

**द्वितीय सत्र : २९ नोव्हेंबर, २०१८ ते ३० एप्रिल, २०१९**

१) नियमित वर्ग : २९ नोव्हेंबर,२०१८ पासून

२) वार्षिक स्नेहसंमेलन : अ) फॅकल्टी डे - २१ डिसेंबर, २०१८ ब) स्नेहसंमेलन - २२ डिसेंबर,२०१८

३) अभ्यासक्रम पूर्ण करणे (द्वितीय सत्र) : २१ मार्च, २०१९ पर्यंत

४) सत्रांत प्रात्यक्षिक परीक्षा (द्वितीय सत्र) : १ एप्रिल, २०१९ ते ११ एप्रिल, २०१९

५) सत्रांत परीक्षा (द्वितीय सत्र) : १२ एप्रिल, २०१९ ते २७ एप्रिल, २०१९

६) सत्रांत परीक्षा निकाल (द्वितीय सत्र) : ०३ जून, २०१९

---

**उन्हाळी सुट्टी : १ मे २०१९ ते १४ जून, २०१९**
**शैक्षणिक वर्ष २०१९-२०२० ची सुरुवात १५ जून, २०१९ पासून**

---

- **शाहू व्याख्यानमाला व स्टाफ ॲकॅडमीच्या वतीने प्रत्येक सत्रात किमान एक कार्यक्रम आयोजित केला जाईल.**

## भाग - १ : पदवी अभ्यासक्रम

विद्यापीठ अनुदान आयोगाने (UGC) शैक्षणिक वर्ष २०१३-१४ पासून वरिष्ठ महाविद्यालयास शैक्षणिक स्वायत्ततेचा दर्जा (Academic Autonomous Status) प्रदान केलेला आहे. त्या अनुषंगाने महाराष्ट्र शासन व स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाने महाविद्यालयास शैक्षणिक स्वायत्ततेच्या अंमलबजावणीची परवानगी दिलेली आहे. त्यानूसार महाविद्यालयाने पदवी व पदव्युत्तर वर्गासाठी तयार केलेल्या अभ्यासक्रमाची रचना पुढील प्रमाणे राहील.

### कला शाखा (Arts Faculty)

**बी.ए. प्रथम वर्ष ( CBCS प्रणाली सह सेमीस्टर पध्दती)**

बी.ए.प्रथम वर्ष प्रथम सेमिस्टर व द्वितीय सेमिस्टर अनुक्रमे ६०० + ५५० = ११५० गुण

**अनिवार्य विषय :** १) संभाषण इंग्रजी (Communicative English), २) भारतीय राज्यघटना (Generic Elective - GE) **द्वितीय भाषा :** मराठी / हिंदी / पाली / संस्कृत यापैकी एका भाषेची निवड करता येईल.

**ऐच्छिक विषय :** खाली दिलेल्या ऐच्छिक विषयापैकी केवळ तीन ऐच्छिक विषय Core Course CC-I, CC-II, CC-III म्हणून निवडता येतील.

ऐच्छिक विषयाची निवड करत असताना एका गटातील एकाच विषयाची निवड करता येईल.

**गट :**

**अ)** मराठी / हिंदी / इंग्रजी / संस्कृत

- द्वितीय भाषेसाठी निवडलेला विषय ऐच्छिक विषय म्हणून घेता येणार नाही.

**उदा :** द्वितीय भाषा म्हणून मराठी घेतल्यास ऐच्छिक मराठी हा विषय घेता येणार नाही.

**ब)** अर्थशास्त्र / लोकप्रशासन / संगणकशास्त्र

**क)** राज्यशास्त्र / भूगोल / संगीत

**ड)** इतिहास / समाजशास्त्र

**इ)** "एन.सी.सी. स्टडीज"/पत्रकारीता (Mass Communication and Journalism) या आंतरविद्या शाखीय विषयापैकी एक विषय निवडता येईल.

**बी.ए. प्रथम - सेमिस्टर I**

| अ.क्र. | विषय | क्रेडिट | गुण |
|---|---|---|---|
| १ | संभाषण इंग्रजी -अनिवार्य | २ | ५० |
| २ | भारतीय राज्यघटना-अनिवार्य (GE) | २ | ५० |
| ३ | द्वितीय भाषा | २ | ५० |
| ४ | ऐच्छिक विषय - CC-I | ३ | ७५ |
| ५ | ऐच्छिक विषय - CC-I | ३ | ७५ |
| ६ | ऐच्छिक विषय - CC-II | ३ | ७५ |
| ७ | ऐच्छिक विषय - CC-II | ३ | ७५ |
| ८ | ऐच्छिक विषय - CC-III | ३ | ७५ |
| ९ | ऐच्छिक विषय - CC-III | ३ | ७५ |
| | **ऐच्छिक भूगोल विषय घेतल्यास** | | |
| १० | ऐच्छिक विषय - CC-I | २ | ५० |
| ११ | ऐच्छिक विषय - CC-I | २ | ५० |
| १२ | प्रात्यक्षिक - CCL-I | २ | ५० |

**बी.ए. प्रथम - सेमिस्टर II**

| अ.क्र. | विषय | क्रेडिट | गुण |
|---|---|---|---|
| १ | संभाषण इंग्रजी -अनिवार्य | २ | ५० |
| २ | द्वितीय भाषा | २ | ५० |
| ३ | ऐच्छिक विषय - CC-I | ३ | ७५ |
| ४ | ऐच्छिक विषय - CC-I | ३ | ७५ |
| ५ | ऐच्छिक विषय - CC-II | ३ | ७५ |
| ६ | ऐच्छिक विषय - CC-II | ३ | ७५ |
| ७ | ऐच्छिक विषय - CC-III | ३ | ७५ |
| ८ | ऐच्छिक विषय - CC-III | ३ | ७५ |
| ९ | मुल्यशिक्षण (G.E) | - | - |

**सूचना :-** सेमिस्टर-I व सेमिस्टर-II मधील ऐच्छिक विषय CC-I, CC-II व CC-III वरील नियमानुसार निवडल्याप्रमाणे राहतील.

● मुल्यशिक्षण हा NCBC (No Credits But Complusory) कोर्स असून त्यामध्ये उत्तीर्ण होणे अनिवार्य आहे. परंतु त्याला Marks किंवा Credits दिले जाणार नाहीत. त्याला Satisfoctory/ Unsatisfoctory असा शेरा देण्यात येईल.

● खालील विषय घेणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रत्येक वर्षी पुढीलप्रमाणे फीस भरावी लागेल.

१) संगीत : १०००/-

२) आंतरविद्या शाखीय विषय : पत्रकारीता (M.C.J.) : १५००/-

● शैक्षणिक वर्ष २०१७-१८ पासून बी.ए. प्रथम वर्षासाठी Choice Based Credit System (CBCS) प्रणाली लागू करण्यात येत आहे. प्रत्येक सत्रासाठी एक पेपर ७५ गुणांचा असून त्यास ०३ क्रेडिट दिले जातील. मात्र इंग्रजी (अनिवार्य), द्वितीय भाषा आणि भारतीय राज्यघटना (GE) यास ५० गुण व ०२ क्रेडिट दिले जातील.

**टिप :** शैक्षणिक वर्ष 2017-18 मध्ये बी.ए.प्रथम वर्षासाठी प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांकरीता पदवी प्राप्त करण्याकरीता 138 क्रेडिट व किमान ४.० CGPA प्राप्त करणे अनिवार्य राहील.

● सर्व शाखेतील सर्व वर्गातील विद्यार्थ्यासाठी उपलब्ध सर्टिफिकेट कोर्सेस :

**(१)** ब्युटिशियन **(२)** GIS **(३)** सुगम संगीत (सदर कोर्स करिता स्वतंत्र शुल्क आकारले जाईल)

## बी.ए. द्वितीय वर्ष (सेमिस्टर पद्धती)

● बी.ए.द्वितीय वर्ष तिसरे व चौथे सेमिस्टर अनुक्रमे ४५० + ४५० = ९०० गुण

● **बी.ए. प्रथम वर्षासाठी निवडलेलेच ऐच्छिक विषय द्वितीय वर्षासाठी राहतील. त्यात कसलाही बदल करता येणार नाही.**

**बी.ए. द्वितीय - सेमिस्टर III**

| अ.क्र. | विषय | क्रेडिट | गुण |
|---|---|---|---|
| १ | सम्भाषण इंग्रजी -अनिवार्य | २ | ५० |
| २ | द्वितीय भाषा | २ | ५० |
| ३ | ऐच्छिक विषय-१ पेपर - V | ३ | ५० |
| ४ | ऐच्छिक विषय-१ पेपर - VI | ३ | ५० |
| ५ | ऐच्छिक विषय-२ पेपर - V | ३ | ५० |
| ६ | ऐच्छिक विषय-२ पेपर - VI | ३ | ५० |
| ७ | ऐच्छिक विषय-३ पेपर - V | ३ | ५० |
| ८ | ऐच्छिक विषय-३ पेपर - VI | ३ | ५० |
| ९ | ॲड ऑन कोर्स | २ | ५० |

**बी.ए. द्वितीय- सेमिस्टर IV**

| अ.क्र. | विषय | क्रेडिट | गुण |
|---|---|---|---|
| १ | सम्भाषण इंग्रजी -अनिवार्य | २ | ५० |
| २ | द्वितीय भाषा | २ | ५० |
| ३ | ऐच्छिक विषय-१ पेपर - VII | ३ | ५० |
| ४ | ऐच्छिक विषय-१ पेपर - VIII | ३ | ५० |
| ५ | ऐच्छिक विषय-२ पेपर - VII | ३ | ५० |
| ६ | ऐच्छिक विषय-२ पेपर - VIII | ३ | ५० |
| ७ | ऐच्छिक विषय-३ पेपर - VII | ३ | ५० |
| ८ | ऐच्छिक विषय-३ पेपर - VIII | ३ | ५० |
| ९ | ॲड ऑन कोर्स | २ | ५० |

● बी.ए.द्वितीय वर्ष तिसऱ्या व चौथ्या सेमिस्टरमध्ये ॲड-ऑन कोर्स (Add-on Course/Skill Enhancement), अभ्यासणे अनिवार्य राहील. त्यास दोन्ही सेमिस्टरमध्ये प्रत्येकी ५० गुण व ०२ क्रेडिट दिले जातील.

**Add on Courses :** १) DTP २) Soft Skill ३) Clay Modelling ४) Journalism
५) Hardware and Networking ६) ब्युटीपार्लर

**शुल्क प्रति कोर्स प्रति सत्र रु. 1000/-**

**टिप :** बी.ए.पदवी पूर्ण करण्याकरीता 154 क्रेडिट तसेच महाविद्यालयाने ठरविल्याप्रमाणे किमान ४.० CGPA प्राप्त करणे अनिवार्य राहील.

● **सर्व शाखेतील सर्व वर्गातील विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध सर्टिफिकेट कोर्सेस**:१) ब्युटिशियन २) G.I.S. ३) सुगम संगीत (सदर कोर्सेस करीता स्वतंत्र शुल्क आकारले जाईल)

## बी.ए. तृतीय वर्ष (सेमिस्टर पद्धती)

- बी.ए.तृतीय वर्ष पाचवे सेमिस्टर व सहावे सेमिस्टर अनुक्रमे ५०० + ५०० = १००० गुण
- **बी.ए. प्रथम वर्षासाठी निवडलेलेच ऐच्छिक विषय तृतीय वर्षासाठी राहतील. त्यात कसलाही बदल करता येणार नाही. मात्र इंग्रजी अनिवार्य व द्वितीय भाषा असणार नाही. तीन ऐच्छिक विषयाचे तीन-तीन पेपर असे प्रत्येक सेमिस्टरसाठी ०९ पेपर असतील.**

| बी.ए. तृतीय - सेमिस्टर V | | | | | बी.ए. तृतीय - सेमिस्टर VI | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| अ.क्र. | विषय | क्रेडिट | गुण | | अ.क्र. | विषय | क्रेडिट | गुण |
| १ | ऐच्छिक विषय-१ पेपर - IX | ३ | ५० | | १ | ऐच्छिक विषय-१ पेपर - XII | ३ | ५० |
| २ | ऐच्छिक विषय-१ पेपर - X | ३ | ५० | | २ | ऐच्छिक विषय-१ पेपर - XIII | ३ | ५० |
| ३ | ऐच्छिक विषय-१ पेपर - XI | ३ | ५० | | ३ | ऐच्छिक विषय-१ पेपर - XIV | ३ | ५० |
| ४ | ऐच्छिक विषय-२ पेपर - IX | ३ | ५० | | ४ | ऐच्छिक विषय-२ पेपर - XII | ३ | ५० |
| ५ | ऐच्छिक विषय-२ पेपर - X | ३ | ५० | | ५ | ऐच्छिक विषय-२ पेपर - XIII | ३ | ५० |
| ६ | ऐच्छिक विषय-२ पेपर - XI | ३ | ५० | | ६ | ऐच्छिक विषय-२ पेपर - XIV | ३ | ५० |
| ७ | ऐच्छिक विषय-३ पेपर - IX | ३ | ५० | | ७ | ऐच्छिक विषय-३ पेपर - XII | ३ | ५० |
| ८ | ऐच्छिक विषय-३ पेपर - X | ३ | ५० | | ८ | ऐच्छिक विषय-३ पेपर - XIII | ३ | ५० |
| ९ | ऐच्छिक विषय-३ पेपर - XI | ३ | ५० | | ९ | ऐच्छिक विषय-३ पेपर - XIV | ३ | ५० |
| १० | प्रकल्प लेखन कच्चा आराखडा | २ | ५० | | १० | प्रकल्प लेखन | २ | ५० |
| ११ | पर्यावरण अभ्यास | ग्रेड | - | | | | | |

- बी.ए. तृतीय वर्ष पाचव्या सेमिस्टरमध्ये 'पर्यावरण अभ्यास' हा विषय अनिवार्य राहील. त्यास ग्रेड दिला जाईल.
- बी.ए.तृतीय वर्ष पाचव्या व सहाव्या सेमिस्टरमध्ये प्रकल्प लेखन अनिवार्य राहील. त्यास प्रति सत्र ५० गुण व ०२ क्रेडिट दिले जातील.

**टिप :** बी.ए.पदवी पूर्ण करण्याकरीता 154 क्रेडिट, तसेच महाविद्यालयाने ठरविल्याप्रमाणे किमान ४.० CGPA प्राप्त करणे अनिवार्य राहील.

**सर्व शाखेतील सर्व वर्गातील विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध सर्टिफिकेट कोर्सेस** :१) ब्युटिशियन २) G.I.S. ३) सुगम संगीत (सदर कोर्सेस करीता स्वतंत्र शुल्क आकारले जाईल)

---

**महाविद्यालयात प्रवेश घेणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांसाठी अनिवार्य सूचना :**

- प्रत्येक विद्यार्थ्यांची उपस्थिती ७५ टक्के असणे अनिवार्य आहे. त्यापेक्षा कमी उपस्थिती राहील्यास परीक्षा फॉर्म भरता येणार नाही.
- ७५ टक्यापेक्षा अधिक उपस्थिती असणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रत्येक पेपरसाठी उपस्थितीच्या प्रमाणानुसार कमाल ५ गुण दिले जातील.
- बी.ए.पदवी अभ्यासक्रमासाठी अंतर्गत व बहिस्थ परीक्षेसाठीचे गुण ४०:६० या अनुपाताने प्रदान केले जातील.
- महाविद्यालयात गणवेश व ओळखपत्र असल्याशिवाय प्रवेश करता येणार नाही.

# B. Voc. Programme

**B. Voc. (Computer Technology):**

UGC Sponsored Degree Programme as per guidelines of National Skill Qualification Framework (NSQF) Bachelor of Vocation in Computer Technology

**Limited Seats:** 50

**Eligibility:** 12th (Arts, Commerce, Science, MCVC, Diploma) Pass

**Special Features:**

1. Integrate NSQF within the undergraduate level of higher education in order to enhance employability of the graduates and meet industry requirements.
2. The Programme is designed to meet industry requirements in the field of Computer Science and IT as per current technology
3. 40% part of the syllabus will thought by industry trainers.
4. Training will be arranged in companies from Pune, Mumbai and Hyderabad
5. Placement assistance will be provided.
6. Well Equipped Laboratory with high speed
7. Qualified and Experienced Faculty.
8. Multiple Entry and Exit Points

| Award | Duration | Corresponding NSQF Level | Job Role |
|---|---|---|---|
| Diploma | 1 Year | 5 | Web Developer |
| Advanced Diploma | 2 Years | 6 | Master Trainer for Jr. Software Developer |
| B. Voc. Degree | 3 Years | 7 | Software Developer |

**For More Details Contact:**

Department of Computer Science

## वाणिज्य शाखा (Commerce Faculty)

Commerce faculty is a leading faculty in Maharastra State. One of the unique features of the Commerce faculty is that, since the inception of parent university S.R.T.M. University, Nanded almost all the merit holders of B.Com. and M.Com. belong to the Commerce faculty of our college. The faculty runs two granted and one self financed division at U.G. level and one self financed division at P.G. level. The alumni of the faculty includes Chartered Accountants, ICWA's, Company Secretaries, Tax Consultants, Central and State Government Officers, Bank and Insurance Officers, Advocates, Lecturers, Politicians, Social Workers, etc. The first IPS lady officer of the Marathwada Region belongs to Commerce faculty of our College.

**Salient features of the faculty** :

**1) Credit System :**

The course is allotted with credits according to the significance of the course. A student must have to earn the minimum credits in order to get the degree.

The minimum credits for U.G.- 130 (CBCS pattern - B.Com I) / 129 (Existing Pattern - B.Com II & III year)

The minimum credits for P.G. - 96 (CBCS pattern - M.Com I) / 96 (Existing Pattern- M.Com II year.)

An additional 5 maximum marks will be allotted for the participation in NCC / NSS / Sports / Cultural / Avishkar / etc.

**2) Grading System :**

Under the autonomous mode, the marks secured by the students will be converted into equivalent grade point. The final result of the performance of a student will be declared on the basis of Cumulative Grade Point Average (CGPA). Minimum CGPA -----

**3) Continuous Internal Evaluation :**

Under the autonomous status, performance of a student is based on Continuous Internal Assessment (CIA) and Semester End Examination (SEE). The weightage of CIA is 40% and SEE is 60%.

**4) Add on Courses for B.Com II year & M.Com II year :**

Under the autonomous mode a student must have to complete two Add-on courses offered in the respective semesters. Add-on courses are mandatory for all students. Separate fees will be charged for these courses. Credits and marks will be given to these courses.

**5) SEC Course for B.Com. I Year :**

Under CBCS pattern the students must have to complete two SEC courses - Tally ERP- 9 at B.Com I year. Separate fees will be charged for these courses.

**6) Value Addition Courses for B.Com. I and B.Com. III Year :**

The student should also pass the value addition courses like Moral Education at B.Com. I and Environmental studies at B.Com.III under U.G. programme. Only grade is allotted for these courses. Under CBCS pattern, (for B.Com-I) the result of such courses will be declared as Satisfactory / Unsatisfactory.

**7) Attendance :**

Minimum 75% attendance is mandatory to appear for Semester End Examination. A maximum of 5 marks is allotted to the students on the basis of percentage of attendance per semester in the respective subjects.

**8) Project Work :**

The students have to complete the Project Work assigned to them under the guidance of the teacher at UG and PG level in the respective specialization subject. It also carries marks and credits.

## B.Com First Year (CBCS-Semester System)

| First Semester | | | |
|---|---|---|---|
| **Sr.** | **Core Course / Subject** | **Credits** | **Marks** |
| 1 | Communicative English | 2 | 50 |
| 2 | Second Language (Marathi / Hindi / Sanskrit / Pali) | 2 | 50 |
| 3 | Financial Accounting – I (CC) | 3 | 75 |
| 4 | Business Statistics (CC) | 3 | 75 |
| 5 | Business Economics – I (CC) | 3 | 75 |
| 6 | Business Regulatory Framework – I / NCC – I (SEEC) | 3 | 75 |
| 7 | Business Communication / NCC-II (SEEC) | 3 | 75 |
| 8 | Tally ERP.9 (SEEC) | 3 | 75 |
| | **Total** | **22** | **550** |

| Second Semester | | | |
|---|---|---|---|
| **Sr.** | **Core Course / Subject** | **Credits** | **Marks** |
| 1 | Communicative English | 2 | 50 |
| 2 | Second Language (Marathi / Hindi / Sanskrit / Pali) | 2 | 50 |
| 3 | Financial Accounting – II (CC) | 3 | 75 |
| 4 | Business Mathematics (CC) | 3 | 75 |
| 5 | Business Economics – II (CC) | 3 | 75 |
| 6 | Business Regulatory Framework – II / NCC – III (SEEC) | 3 | 75 |
| 7 | Business Environment / NCC-IV (SEEC) | 3 | 75 |
| 8 | Moral Education (GE) | - | - |
| | **Total** | **19** | **475** |

## B.Com Second Year (Semester System)

| Third Semester | | | |
|---|---|---|---|
| **Sr.** | **Subject** | **Credits** | **Marks** |
| 1 | Communicative English | 2 | 50 |
| 2 | Second Language (Marathi / Hindi / Sanskrit / Pali) | 2 | 50 |
| 3 | Corporate Accounting – I (CC) | 3 | 75 |
| 4 | Cost Accounting – I (CC) | 3 | 75 |
| 5 | Economic Planning of India (CC) | 3 | 75 |
| 6 | Human Resource Management (CC) | 3 | 75 |
| 7 | Income Tax - I /NCC-V (SEEC) | 3 | 75 |
| 8 | Retail Management / NCC-VI (SEEC) | 3 | 75 |
| 9 | Add-on Course : Soft Skill / DTP (SEEC) | 3 | 75 |
| | **Total** | **25** | **625** |

| Fourth Semester | | | |
|---|---|---|---|
| **Sr.** | **Subject** | **Credits** | **Marks** |
| 1 | Communicative English | 2 | 50 |
| 2 | Second Language (Marathi / Hindi / Sanskrit / Pali) | 2 | 50 |
| 3 | Corporate Accounting – II (CC) | 3 | 75 |
| 4 | Cost Accounting – II | 3 | 75 |
| 5 | Economic Development of India (CC) | 3 | 75 |
| 6 | Financial Management (CC) | 3 | 75 |
| 7 | Income Tax - II /NCC-VII (SEEC) | 3 | 75 |
| 8 | Principles and Practices of Insurance / NCC-VIII 9SEEC) | 3 | 75 |
| - | - | - | - |
| | **Total** | **22** | **550** |

## B.Com Third Year (Semester System)

| Fifth Semester | | | | | Sixth Semester | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| Sr. | Subject | Credit | Marks | | Sr. | Subject | Credits | Marks |
| 1 | Advanced Accounting – I | 3 | 50 | | 1 | Advanced Accounting – II | 3 | 50 |
| 2 | Management Accounting – I | 3 | 50 | | 2 | Management Accounting – II | 3 | 50 |
| 3 | Auditing – I / NCC-IX | 3 | 50 | | 3 | Auditing – II /NCC-XI | 3 | 50 |
| 4 | Corporate Law / NCC-X | 3 | 50 | | 4 | Research Methodology/NCC-XII | 3 | 50 |
| 5 | Banking and Finance – I /Entrepreneurship Development- I | 3 | 50 | | 5 | Banking and Finance – III /Entrepreneurship Development - II | 3 | 50 |
| 6 | Banking and Finance – II /Entrepreneurship Development- II | 3 | 50 | | 6 | Banking and Finance – IV /Entrepreneurship Development - IV | 3 | 50 |
| 7 | Environmental Studies | Only Grade | 50 | | 7 | Project work based on Banking and Finance / Entrepreneurship Development | 3 | 50 |
| | **Total** | **18** | **350** | | | **Total** | **21** | **350** |

## Certificate Courses for B.Com I, II & III

| Sr.No. | Course |
|---|---|
| 1 | Beautician |
| 2 | Geographical Information System (GIS) |
| 3 | Vocal Light Music |

***Note :** Separate fee will be charged for all these certificate courses.*

## विज्ञान शाखा (Science Faculty)

**बी.एस्सी. प्रथम वर्ष (CBCS प्रणालीसह सेमीस्टर पध्दती)**

बी.एस्सी. प्रथम वर्ष - सेमिस्टर प्रथम व द्वितीय अनुक्रमे ५५०+५५०=११०० गुण

* Ability Enhancement Compulsory Courses (AECC)

*** अनिवार्य विषय :** सम्भाषण इंग्रजी (Communicative English)

*** द्वितीय भाषा :** मराठी / हिंदी / पाली / संस्कृत

*** ऐच्छिक विषय(Core Courses) :** बी.एस्सी. प्रथम वर्षासाठी प्रवेश घेणाऱ्या प्रत्येक विद्यार्थ्यास खालीलपैकी कोणत्याही एका विषयगटाची ऐच्छिक विषयगट Core Course गट (CC-I,CC-II, CC-III) म्हणून निवड करावी लागेल.

| गट क्र. | ऐच्छिक विषय गट (Core Course गट) | | |
|---|---|---|---|
| | CC-I | CC-II | CC-III |
| ०१. | भौतिकशास्त्र | रसायनशास्त्र | गणित |
| ०२. | भौतिकशास्त्र | इलेक्ट्रॉनिक्स | गणित |
| ०३. | भौतिकशास्त्र | संगणकशास्त्र | गणित |
| ०४. | भौतिकशास्त्र | एन.सी.सी./ | गणित |
| ०५. | भौतिकशास्त्र | रसायनशास्त्र | ॲनॅलिटिकल केमिस्ट्री |
| ०६. | रसायनशास्त्र | वनस्पतीशास्त्र | प्राणिशास्त्र |
| ०७. | रसायनशास्त्र | वनस्पतीशास्त्र | सूक्ष्मजीवशास्त्र |
| ०८. | रसायनशास्त्र | प्राणिशास्त्र | मत्स्यशास्त्र |

०१) बी.एस्सी. प्रथम या वर्गाला प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यासाठी Choice Based Credit System (CBCS) प्रणाली लागू राहिल.

०२) बी.एस्सी.प्रथम वर्षासाठी गणित Core Course विषय घेणाऱ्या विद्यार्थ्यांना १२ वी विज्ञान वर्गात गणित हा विषय असणे अनिवार्य आहे.

०३) बी.एस्सी प्रथम वर्षासाठी CBCS प्रणाली अंतर्गत इंग्रजी व द्वितीय भाषा (प्रत्येकी ५० गुण) हे Ability Enhancement Compulsory Courses (AECC) म्हणून राहतील.

०४) बी.एस्सी. पदवी अभ्यासक्रम पूर्ण करण्यासाठी विद्यार्थ्यांना बी.एस्सी. प्रथम वर्षाच्या द्वितीय सेमिस्टरमध्ये मूल्यशिक्षण (GE - Generic Elective) अभ्यासक्रम NSBC (No Credit But Compulsory) धर्तीवर पूर्ण करणे अनिवार्य असेल. परंतु त्याला Marks किंवा Credit दिले जाणार नाहीत. त्याला Satisfactory / Unsatisfactory असा Grade / शेरा देण्यात येईल.

## बी.एस्सी. द्वितीय वर्ष : (CBCS प्रणालीसह सेमीस्टर पध्दती)

बी.एस्सी. द्वितीय वर्ष - सेमिस्टर तृतीय व चतुर्थ अनुक्रमे ७५०+७५०=१५०० गुण

* Ability Enhancement Compulsory Courses (AECC)

*** अनिवार्य विषय :** सभाषण इंग्रजी (Communicative English)

*** द्वितीय भाषा :** मराठी / हिंदी / पाली / संस्कृत

*** ऐच्छिक विषय(Core Courses) :**

१) बी.एस्सी. प्रथम वर्षासाठी निवडलेले ऐच्छिक विषय द्वितीय वर्षासाठी अभ्यासावे लागतील.

२) बी.एस्सी द्वितीय वर्षासाठी CBCS प्रणाली अंतर्गत इंग्रजी व द्वितीय भाषा (प्रत्येकी ५० गुण) हे Ability Enhancement Compulsory Courses (AECC) म्हणून राहतील.

३) बी.एस्सी द्वितीय वर्षासाठी तीसऱ्या व चौथ्या सेमिस्टरमध्ये, CBCS प्रणाली अंतर्गत Skill Enhancement Cours अभ्यासणे अनिवार्य राहील. त्यास दोन्ही सेमिस्टरमध्ये प्रत्येकी ५० गुण व २ क्रेडीट दिले जातील.

## बी.एस्सी. तृतीय वर्ष

०१) बी.एस्सी. तृतीय वर्षासाठी बी.एस्सी प्रथम व द्वितीय वर्षातील विषयच अभ्यासावे लागतील.

०२) बी.एस्सी.तृतीय वर्षासाठी अनिवार्य इंग्रजी व द्वितीय भाषा राहणार नाहीत.

०३) बी.एस्सी.तृतीय वर्षासाठी CBCS प्रणाली राहणार नाही.

०४) बी.एस्सी.तृतीय वर्षाच्या पाचव्या सेमिस्टरमध्ये ५० गुणांचा पर्यावरणअभ्यास हा विषय अभ्यासावा लागेल. तसेच सहाव्या सेमिस्टरमध्ये ५० गुणांचा कोणत्याही एका ऐच्छिक विषयातील संशोधन प्रकल्प (Project Work) पूर्ण करणे अनिवार्य असेल.

**बी.एस्सी. पदवी : सर्वसाधारण नियम**

०१) बी.एस्सी. प्रथम, द्वितीय व तृतीय वर्षासाठी सेमिस्टर पद्धती लागू राहिल.

०२) बी.एस्सी पदवी श्रेयांक (Credits) पध्दतीवर अधारीत असेल

०३) NCC, NSS, सांस्कृतिक कार्यक्रम व खेळ इत्यादी उपक्रमांमधील सहभागासाठी अतिरिक्त जास्तीत जास्त ०५ गुण दिले जातील.

०४) बी.एस्सी. पदवी अभ्यासक्रमासाठी अंतर्गत व बहिस्थ परीक्षेसाठीचे गुण ४०:६० या अनुपाताने प्रदान केले जातील.

०४) बी.एस्सी. साठी प्रवेश घेणाऱ्या प्रत्येक विद्यार्थ्यांस अभ्यासक्रमाला अनुसरून विविध उपक्रमांमध्ये भाग घेण्यासाठी दररोज किमान साडे चार ते पाच तास महाविद्यालयात उपस्थित राहणे आवश्यक आहे.

०५) बी.एस्सी. पदवी पूर्ण करण्याकरिता प्रत्येक विद्यार्थ्यांने एकूण १५२ श्रेयांक (Credits) तसेच महाविद्यालयाने ठरविल्याप्रमाणे किमान ०४.०० CGPA प्राप्त करणे अनिवार्य राहिल.

०६) प्रत्येक विद्यार्थ्यांची उपस्थिती किमान ७५% असणे अनिवार्य आहे. ज्यांची उपस्थिती ७५% पेक्षा कमी असेल त्यांना संबंधित सेमिस्टरचा परीक्षा फॉर्म भरता येणार नाही. तसेच ज्यांची उपस्थिती ७५% पेक्षा अधिक असेल अशा विद्यार्थ्यांना प्रत्येक पेपरसाठी उपस्थितीच्या प्रमाणानुसार कमाल ५ गुण दिले जातील.

०७ वरील अभ्यासक्रमांव्यतिरिक्त विद्यापीठ अनुदान आयोगामार्फत वेळोवेळी चालविल्या जाणाऱ्या पायाभूत विज्ञान संशोधन प्रकल्पासाठी गुणवत्ताधारक विद्यार्थ्यांची निवड करण्यात येईल व तो पूर्ण करण्यासाठी त्यांना शिष्यवृत्ती दिली जाईल.

**NCC Studies (Interdisciplinary Elective) For all UG courses**

**1) Introduction :**

Our visionary leader Late Hon. Jawaharlal Nehru decided to create an organization to mould youth of the country into better citizens of tomorrow. His dream is fulfilled by establishmaent of NCC Organization from 15th July, 1948.

National Cadet Corps (NCC) provides a platform for individual upliftment through the process of channelizing the energy of the youth in constructive pursuits. It also helps the youth to realize the intimate relationship between human being and the community.

It is high time now to strengthen, to empower the youth and make them useful human resource for the nation building.

It is an important initiative taken by Ministry of HRD/Ministry of Defense and UGC to introduce NCC as an elective subject at UG level from the academic year 2013-14. Our college has introduced NCC as one of the optional subjects at UG level from the academic year 2014-15.

**2) Title of the Subject : N.C.C Studies (Interdisciplinary Elective)**

**3) Objectives :**

1. To develop organized, trained and motivated youth, to provide leadership in all walks of life and be always available for the service of the nation.
2. To empower the youth with values and skills that could be used in the national interest.
3. To make aware about ecological environment.
4. To provide a suitable environment to stimulate interest of the youth to take up a career in the Armed Forces.
5. To develop the qualities of comradeship, courage, character, discipline, secular outlook, spirit of adventure, sportsmanship among the youth.
6. To make them responsible citizens and ideal of selfless service to the society.

**4) Advantages :**

1) Enhancement of skill and patriotic values among youth.
2) Empowerment of youth and overall personality development.
3) Employability in defense, paramilitary forces and other services.
4) Attainment of qualities of good citizenship and ideals of selfless services.

| | |
|---|---|
| **5) Duration of the Course** | **: Three Years** |
| **6) Faculties** | **: B.A./B.Com./B.Sc.** |
| **7) Intake Capacity** | **: 30** |
| **8) Admission Procedure** | **: Direct Admission (On Merit Basis)<br>(Subject to Fulfilment of Eligibility)** |
| **9) Medium of Course** | **: English / Hindi** |

## भाग 2 : पदव्युत्तर अभ्यासक्रम

### कला शाखा : एम.ए.

### एम.ए. प्रथम वर्ष (CBCS प्रणाली सह सेमिस्टर पद्धती)

एम.ए. पदव्यूत्तर पदवी ही एकूण १७००+१०० (Project) = १८०० गुणांची असून त्यास ९० क्रेडिट दिले जातील.

* प्रथम व द्वितीय सेमिस्टरमध्ये १०० गुणांचे प्रत्येकी चार पेपर (Core Courses) राहतील. प्रत्येक पेपरसाठी ५ क्रेडिट दिले जातील.
* १०० गुणांपैकी ६० गुण बहीस्थ मूल्यमापनासाठी व ४० गुण अंतर्गत मूल्यांकनासाठी असतील.
* एम.ए. प्रथम वर्ष एकूण ८०० गुण व ४० क्रेडिटचे राहील.

**एम.ए.भूगोल : प्रथम वर्ष**

| Core Courses (Ist Semester) | Core Courses (IInd Semester) |
|---|---|
| Course I - Geomorphology | Course V - Economic Geography |
| Course II - Climatology | Course VI - Urban Geography |
| Course III - Oceanography | Course VII - Political Geography |
| Course IV - Practical Geography - I | Course VIII - Practical Geography - II |

**एम.ए.अर्थशास्त्र : प्रथम वर्ष**

| Core Courses (Ist Semester) | Core Courses (IInd Semester) |
|---|---|
| Course I - Micro Economics | Course VI - Micro Economics |
| Course II - Macro Economics | Course VII - Macro Economics |
| Course III - International Economics | Course VIII - Internationl Economics |
| Course IV - Agrictural Economics | Course IX - Agrictural Economics |
| OR | OR |
| Course V - Mathematical Economics | Course X - Mathematical Economics |

## Course Codes and their Titles
## M.A. First Year (Political Science) Semester with CBCS

| Semester I | |
|---|---|
| **Code No.** | **Title of the Core course (CC)** |
| P-POT-155 | Political Theory - I |
| P-PNC-156 | Indian Constitution - II |
| P-WPT-157 | Western Political Thinkers - III |
| | **Title of the Elective** |
| | Election Process in India - IV-A<br>**OR**<br>Issues in Rural Governance in India - B |
| | Assignment |

| Semester II | |
|---|---|
| **Code No.** | **Title of the Core course (CC)** |
| P-ENR-255 | International Relations - V |
| P-IGP-256 | Indian Government & Politics - VI |
| P-IPT-257 | Indian Political Thinkers - VII |
| | **Title of the Elective** |
| | Human Rights - VIII-A<br>**OR**<br>Comparative Politics - B |
| | Seminar |

## Course Codes and their Titles
## M.A. Second Year (Political Science) Semester

| Semester III | |
|---|---|
| **Code No.** | **Title of the Core course (CC)** |
| | Research Methodology - IX |
| | Indian foreign policy - X |
| | Political Process in India - XI |
| | Pressure Groups & Social Movements - XII |
| | Public Policy - XIII |

| Semester IV | |
|---|---|
| **Code No.** | **Title of the Core course (CC)** |
| | Public Administration - XIV |
| | Modern Political Ideology - XV |
| | Political Sociology - XVI |
| | International Organizations - XVII |
| | Project work |

## एम.ए.इंग्रजी: प्रथम व द्वितीय वर्ष

PG Department of English is established in 2017. The department has a state of the art infrastructural facilities and advanced digital language lab for PG students.

**Semester - I**

| Course Code | Course Title |
|---|---|
| P-ENP-151 | English Poetry |
| P-END-152 | English Drama |
| P-ENF-153 | English Fiction |
| P-CSK-154-A | Communication Skills **OR** |
| P-BCL-154-B | Basic Concepts in Linguistics |
| | Assignment |

**Semester - II**

| | |
|---|---|
| P-ENP-251 | English Poetry |
| P-END-252 | English Drama |
| P-ENF-253 | English Fiction |
| P-CML-254-A | Comparative Literature **OR** |
| P-TRS-254-B | Translation Studies |
| | Assignment |

**Semester - III**

| Course Code | Course Title |
|---|---|
| P-REM-351 | Research Methodology |
| P-CIT-352 | Critical Theories |
| P-WOW-353 | Women's Writings |
| P-IWE-354(A) | Indian Writing in English**OR** |
| P-AML-354(B) | American Literature |
| | Seminar |

**Semester - IV**

| Course Code | Course Title |
|---|---|
| P-ENP-447 | English Language Teaching |
| P-CIT-448 | Critical Theories |
| P-SPA-449 | Special Author |
| P-IWE-450A | Indian Writing in English**OR** |
| P-AML-450B | American Literature |
| | Seminar |
| | Dissertation |

## विद्यापीठ मान्यताप्राप्त संशोधन केंद्र व सुविधा

**संशोधन केंद्र**

१) मराठी ४) भौतिकशास्त्र ७) प्राणीशास्त्र
२) भूगोल ५) रसायनशास्त्र
३) वाणिज्य ६) सूक्ष्मजीवशास्त्र

**संशोधन सुविधा**

१) राज्यशास्त्र ३) पाली ५) जैवतंत्रज्ञान
२) लोकप्रशासन ४) मत्स्यशास्त्र ६) वनस्पतीशास्त्र

- **नोट : महाविद्यालयात बी. एस्सी., एम.एस्सी. (बायोटेक्नॉलॉजी) बी.एस्सी. (सी.एस) बीसीए, एम.एस्सी (सी.एस) हे अभ्यासक्रम चालविले जातात, त्याची स्वतंत्र माहिती पूस्तीका आहे.**

## एम.ए. द्वितीय वर्ष (सेमिस्टर पद्धती)

* तिसऱ्या सेमिस्टरमध्ये १०० गुणांचे पाच पेपर राहतील. प्रत्येक पेपरसाठी ५ क्रेडिट दिले जातील
* चौथ्या सेमिस्टरमध्ये १०० गुणांचे चार पेपर व एक १०० गुणांचा प्रकल्प राहील. त्यास प्रत्येकी ५ क्रेडिट दिले जातील.
* १०० गुणांपैकी ६० गुण बहीस्थ मूल्यमापनासाठी व ४० गुण अंतर्गत मूल्यांकनासाठी असतील.
* द्वितीय वर्ष एकूण १००० गुण व ५० क्रेडिटचे राहिल.

### एम.ए.भूगोल : द्वितीय वर्ष

| III[rd] Semester | IV[th] Semester |
|---|---|
| Course IX - History of Geographical Thought | Course XIV - Population Geography |
| Course X - Geography of Regional Planning | Course XV - Biogeography |
| Course XI - Agricultural Geography | Course XVI - Social and Cultural Geography |
| Course XII - Research Methodology | Course XVII - Practical Geography - IV |
| Course XIII - Practical Geography-III | Course XVIII - Project Work |

### एम.ए.अर्थशास्त्र : द्वितीय वर्ष

| III[rd] Semester | IV[th] Semester |
|---|---|
| Course IX - Indian Economic Policy | Course XIV - Indian Economic Policy |
| Course X - Public Economic Policy | Course XV - Public Economic Policy |
| Course XI - Economic of Growth and Development | Course XVI - Economic of Growth and Development |
| Course XII - Econometrics | Course XVII - Econometrics |
| **OR** Financial Institutions and Markets | **OR** Financial Institutions and Markets |
| **OR** Quantitative Techniques | **OR** Quantitative Techniques |
| Course XIII - Research Methodology | Course XVIII - Project Work |

### एम.ए.संस्कृत : द्वितीय वर्ष

| III[rd] Semester | IV[th] Semester |
|---|---|
| Course IX - संस्कृत महाकाव्य | Course XIV -संस्कृत व्याकरण |
| Course X - पाणिनीय व्यकरण | Course XV - संस्कृत-पाली प्राकृत-मराठी सबन्ध |
| Course XI - अर्वाचीन संस्कृत साहित्य | Course XVI- भारतीय कला-विविध शास्त्रे व संस्कृत |
| Course XII - भाषाशास्त्र | Course XVII- चम्पूकाव्य |
| Course XIII - संस्कृत संशोधनम् | Course XVIII - प्रकल्प लेखन |

## M. A. (MASS COMMUNICATION AND JOURNALISM ) M.A. I Year

जनसंज्ञापन आणि वृत्तपत्रविद्या विभाग मार्फत एम.ए. एम.सी.जे. हा अभ्यासक्रम चालविला जातो. सदर अभ्यासक्रम हा दोन वर्षाचा व चार सत्राचा आहे. एकूण गुण 1000 असून पहिल्या, दूसऱ्या व तिसऱ्या सत्रात चार थेअरी पेपर व एक प्रात्यक्षिक पेपर आणि चौथ्या सत्रात तीन थेअरी पेपर एक लघुशोध प्रबंध आणि एक प्रात्यक्षिक असे प्रत्येक सत्राला 500 गुण आहेत. अभ्यासक्रमाला प्रवेशासाठी कोणत्याही विद्याशाखेचा पदवीधर असणे आवश्यक आहे. अभ्यासक्रमाला अभ्यासदौरा, विविध माध्यमांना भेटी आणि किमान एक महिन्याची अंतरवासीयता अनिवार्य आहे. प्रात्यक्षिकासाठी महाविद्यालयाकडे दृकश्राव्य माध्यमाची स्वतंत्र प्रयोगशाळा आहे.

**SEMESTER - I**

| Course Code | Course Title |
|---|---|
| MC 01 | Introduction to Mass Communication |
| MC 02 | News Reporting & Editing |
| MC 03 | History Of Media |
| MC 04 | Media Manegment |
| MC 05 | Practical |

**SEMESTER - II**

| Course Code | Course Title |
|---|---|
| MC 06 | Media Law & Ethics |
| MC 07 | Communication Research |
| MC 08 | Development of Communication |
| MC 09 | International Issues, Ideas and Challenges |
| MC 10 | Practical |

## M.A. II Year

**Core Subject (Two) + Practical**

**SEMESTER-III**

| Course Code | Course Title |
|---|---|
| MC 11 | Radio, T .V. & Film Journalism |
| MC12 | Advertising & Corporate Communication |
| MC 13 | Practical |
| | **Elective (Any Two MC14,MC 15)** |
| | : Agriculture & Rural Journalism |
| | : Environment or Science Journalism |
| | : Sport Journalism |
| | : Public Relation & Digital PR |

**Core Subject (Two) + Practical**

**SEMESTER - IV**

| Course Code | Course Title |
|---|---|
| MC16 | New Media Technology |
| MC 17 | Dissertation & Viva-Voce |
| MC -18 | Practical Study Visit & Internships |
| | **Elective (Any Two MC-19,MC-20 )** |
| MC | Social Media |
| MC | Current Affairs |
| MC | International Communication |
| MC | Magazine Journalism |

## वाणिज्य शाखा : एम.कॉम.

### M.Com First Year - (Under CBCS with Semester Pattern)

| | First Semester | | | |
|---|---|---|---|---|
| | Sr. | Core Courses / Subject | Credits | Marks |
| M.com I (Sem - I) | 1 | Advanced Statistical Techniques | 5 | 100 |
| | 2 | Organizational Behaviour | 5 | 100 |
| | 3 | Managerial Economics | 5 | 100 |
| | 4 | International Business Environment | 5 | 100 |
| | 5 | Marketing Management - I | 5 | 100 |
| | | **Total** | **25** | **500** |

| | Second Semester | | | |
|---|---|---|---|---|
| | Sr. | Core Courses / Subject | Credits | Marks |
| M.com I (Sem - II) | 1 | Intellectual Property Law | 5 | 100 |
| | 2 | E-Commerce | 5 | 100 |
| | 3 | Human Resource Management | 5 | 100 |
| | 4 | Advanced Taxation | 5 | 100 |
| | -- | - | - | - |
| | | **Total** | **20** | **400** |

### M.Com Second Year (CBCS-Semester Pattern)

| | Third Semester | | | |
|---|---|---|---|---|
| | Sr. | Subject | Credits | Marks |
| M.com II (Sem - III) | 1 | Accounts and Finance | 5 | 100 |
| | 2 | Applied Cost Accounting | 5 | 100 |
| | 3 | Banking and Finance –I | 5 | 100 |
| | 4 | Banking and Finance –II | 5 | 100 |
| | 5 | Marketing Management | 5 | 100 |
| | | **Total** | **25** | **500** |

| | Fourth Semester | | | |
|---|---|---|---|---|
| | Sr. | Subject | Credits | Marks |
| M.com II (Sem - IV) | 1 | Advanced Financial Accounting | 5 | 100 |
| | 2 | Research Methodology | 5 | 100 |
| | 3 | Banking and Finance –III | 5 | 100 |
| | 4 | Banking and Finance –IV | 5 | 100 |
| | 5 | Project Work Based on Banking and Finance | 6 | 100 |
| | | **Total** | **26** | **500** |

## Science Faculty : M.Sc. Physics (Photonics)

M.Sc. Physics (Photonics) Course is started in 2007 under UGC's innovative programme scheme to cater the needs of students in this region. The infrastructure of the department is very sound. We have well equipped laboratories for M.Sc. I and II practicals with advanced instruments.The department has two research laboratories; one for Material science and Holography which are used for project work. The deparement is a university recognised research centre.

## Course Codes and their Titles

**M.Sc. I [Physics (Photonics)] Semester with CBCS**

| Semester I | | Semester II | |
|---|---|---|---|
| **Code No.** | **Title of the Core Course (CC)** | **Code No.** | **Title of the course Core Course (CC)** |
| P-MMP-119 | Mathematical Methods in Physics - I | P-CMP-219 | Condensed Matter Physics - V |
| P-CSM-120 | Classical and Statistical Mechanics - II | P-AMP-220 | Atomic and Molecular Physics - VI |
| P-QUM-121 | Quantum Mechanics - III | P-MOO-221 | Modern Optics - VII |
| P-ELD-122 | Electronics Devices - IV | P-ECS-222 | Electronic Communication Systems - VIII |
| P-LAC-123 | Lab. Course - I | P-LAC-223 | Lab. Course - III |
| P-LAC-124 | Lab. Course - II | P-LAC-224 | Lab. Course - IV |
| P-SEM-125 | Seminar I | P-SEM-225 | Seminar II |

**M.Sc. II [Physics (Photonics)] Semester with CBCS**

| Semester III | | Semester IV | |
|---|---|---|---|
| **Code No.** | **Title of the course** | **Code No.** | **Title of the course** |
| P-EPP-321 | Electrodynamics and Plasma Physics -IX | P-FOA-419 | Fiber Optics and its Applications - XIII |
| P-NPP-322 | Nuclear and Particle Physics - X | P-LSA-420 | Laser system & its applications - XIV |
| P-LET-323 | Laser Technology - XI | P-PDS-421 | Photonic Devices and Sensors - XV |
| P-TFN-324 A OR P-EXT-324 B | Thin Film and Nanotechnology - XII A OR Experimental Techniques-XII B | P-IPE-422A OR P-ENP-422B | Industrial Photonic Engineering - XVI A OR Energy Physics-XVI B |
| P-LAC-325 | Lab Course - V | P-LAC-423 | Lab Course - VI |
| P-PRO-326 | Project - I | P-PRO-424 | Project - II |
| P- SEM-327 | Seminar | P- SEM- 425 | Seminar |

## Science Faculty : M.Sc. Chemistry (Organic Chemistry)

PG Department of Chemistry is established in 2014. The department has a state of the art infrastrucutural facilities. Department has well equiped laboratories with advanced instrument facility for M.Sc. practicals. Department has collabration with N.C.L. Pune and I.I.C.T. Hyderabad for completing the M.Sc. Project work . The department is a university recognised Research Centre.

**M.Sc. - I year (Semester with CBCS)**

| Core Course Codes and Titles | | | | |
|---|---|---|---|---|
| **Semester I** | | | **Semester II** | |
| **Code No.** | **Title of the Core Course (CC)** | | **Code No.** | **Title of the Core Course (CC)** |
| CCPC-I | Inorganic Chemistry - I | | CCPC-V | Inorganic Chemistry - V |
| CCPC-II | Organic Chemistry - II | | CCPC-VI | Organic Chemistry - VI |
| CCPC-III | Physical Chemistry - III | | CCPC-VII | Physical Chemistry - VII |
| CCPC-IV | Analytical Chemistry - IV | | CCPC-VIII | Analytical Chemistry - VIII |
| CCPC-L-I | Lab. Course - I | | CCPC-L-V | Lab. Course - V |
| CCPC-L-II | Lab. Course - II | | CCPC-L-VI | Lab. Course - VI |
| CCPC-L-III | Lab. Course - III | | CCPC-L-VII | Lab. Course - VII |
| CCPC-L-IV | Lab. Course - IV | | CCPC-L-VIII | Lab. Course - VIII |
| CCPCS-I | Seminar | | CCPCS-II | Seminar |

**M.Sc. - II year (Semester with CBCS)**

**Course Codes and Titles**

| **Semester III** | | | **Semester IV** | |
|---|---|---|---|---|
| **Code No.** | **Title of the Course** | | **Code No.** | **Title of the Course** |
| P-ASM-343 | Advanced Spectroscopic Methods -IX | | P-ASM- 439 | Advanced Synthetic Methods -XIII |
| P-OTF- 344 | Organic Transformations- X | | P-STE-440 | Stereochemisty - XIV |
| P-CNP-345 | Chemistry of Natural Products - XI | | P-AHC-441 | Advanced Heterocyclic Chemistry - XV |
| P-MDC-346(A) | Elective : A. Medicinal Chemistry XII | | P-AOC-442 (A | Elective : A. Applied Organic Chemistry - XVI |
| P-POC-346(B) | B. Polymer Chemistry XII | | P-DAI-442 (B) | B. Dyes and Intermediates XVI |
| P-LAC-347 | Lab. Course - IX | | P-LAC-443 | Lab. Course - XII |
| P-LAC-348 | Lab. Course - X | | P-LAC-444 | Lab. Course - XIII |
| P-LAC-349 | Lab. Course - XI | | P-LAC-445 | Lab. Course - XIV |
| | Project Work | | P-PRO-446 | Project Work |
| | Seminar | | | Seminar |

## Science Faculty : M.Sc. (Mathematics)

# M.Sc. I year (Semester with CBCS)

### Semester I

| Course Code | Title of the course with paper number |
|---|---|
| P-ABA-164 | Abstract Algebra |
| P-ADC-165 | Advanced Calculus |
| P-ODE-166 | Ordinary Differential Equations |
| P-COA-167 | Complex Analysis-I |
| **Elective-I** | Choose any one |
| P-DIM-168(A) | Discrete Mathematics(A) |
| Or | or |
| P-THP-168(B) | Theory of Probability(B) or |
| P-COM-168(C) | Combinatorics (C) |
| P-LAB-169 | Lab Work-I(Latex Typesetting ) |
| P-SEM-170 | Seminar |
| | Total Credits |

### Semester II

| Course Code | Title of the course with paper number |
|---|---|
| P-LIA-264 | Linear Algebra |
| P-MIT-265 | Measure and Integration Theory |
| P-TOP-266 | Topology |
| P-PDE-267 | Partial Differential Equations |
| **Elective-II** | Choose-I |
| P-COA-268 (A) | Complex Analysis-II |
| | Or |
| | Operations Research |
| P-OPR-268 (B) | Or |
| | Number Theory |
| P-NUT-268 (C) | |
| P-LAB-269 | Lab work (Writing and Presentation using LaTeX) |
| P-SEM-270 | Seminar |
| | Total Credits |

### Semester III

| Course Code | Title of the course with paper number |
|---|---|
| P-FUA-364 | Ring Theory |
| P-LIE-365 | Functional Analysis |
| **Elective-III** | |
| P-COT-366(A) | Coding Theory –I Or |
| P-FRC-366(B) | Fractional Calculus-I |
| **Elective-IV** | |
| P-CLM-367(A) | Classical Mechanics Or |
| P-NLA-367(B) | Numerical Linear Algebra-I |
| P-LAB-368 | Foundations of Analysis-I |
| P-LAB-369 | Project |
| P-SEM-170 | Seminar |
| | Total Credits |

### Semester IV

| Course Code | Title of the course with paper number |
|---|---|
| P-FIT-464 | Field Theory |
| P- -365 | Linear Integral Equations |
| **Elective-V** | Coding Theory –II Or |
| P-COT-466(A) | Boundary Value Problems |
| P-FRC-466(B) | |
| **Elective-VI** | Numerical Analysis |
| P-CLM-467(A) | Or |
| P-NLA-467(B) | Numerical Linear Algebra-II |
| P-LAB-468 | Foundations of Analysis-II |
| P-LAB-469 | Project |
| P-SEM-470 | Seminar |
| | Total Credits |

## Science Faculty : M.Sc. Botany (CBCS)

### Core Course Codes and their Titles

M.Sc. Botany programme is started from the year June 2017. The curriculum is designed by taking in to account the competitive examinations as well as NET and SET examinations. The advanced courses like Plant Nanotechnology and Forensic Botany have been included in the curriculum. The infrastructure of the department is tuned with the time. The laboratories of the department are well equipped with advanced instruments.

| Semester I | |
|---|---|
| **Code No.** | **Title of the Core Course(CC)** |
| P-INB-171 | Instrumentation and Biostatistics |
| P-DMC-172 | Diversity of Microbes and Cryptogams. |
| P-PLB-173 | Plant Biochemistry |
| P-PEE-174 | Plant Ecology and Evolution |
| P-LAC-175 | (Lab Course I )Based on theory paper BO 1.1 and BO 1.2 |
| P-LAC-176 | (Lab Course II ) Based on theory paper BO 1.3 and BO 1.4 |
| | Students Seminars |

| Semester II | |
|---|---|
| **Code No.** | **Title of the Core Course(CC)** |
| P-DPG-271 | Diversity of Pteridophytes, Gymnosperms, and Fossil Plants. |
| P-CEB-272 | Cell Biology |
| P-PPM-273 | Plant Physiology and Metabolism |
| P-PSD-274 | Plant Structure, Development& Reproduction in Angiosperms |
| P-LAC-277 | Based on theory paper BO 2.1 and BO 2.2 |
| P-LAC-278 | Based on theory paper BO 2.3 and BO 2.4 |
| | Students Seminars |

| Semester III | |
|---|---|
| **Code No.** | **Title of the Core Course(CC)** |
| P-ANS-371 | Angiosperms Systematics |
| P-MOB-372 | Molecular Biology |
| P-PNF-373 | Plant Nanotechnology and Forensic Botany |
| P-PLP-374 | Plant Pathology-I/Genetics-I/ Plant Biotechnology- I |
| P-LAC-375 | Based on theory paper BO 3.1 and BO 3.2 |
| P-LAC-376 | Based on theory paper BO 3.3 and BO 3.4 |
| | Students Seminars |

| Semester IV | |
|---|---|
| **Code No.** | **Title of the Core Course(CC)** |
| P-CPB-471 | Cytogenetics and Plant Breeding |
| P-PBG-472 | Plant Biotechnology and Genetic Engineering |
| P-PLP-473 | Plant Pathology-II / Genetics-II / Plant Biotechnology-II |
| P-PLP-474 | Plant Pathology-III / Genetics -III/ Plant Biotechnology-III |
| P-LAC-477 | Based on theory paper BO 4.1 , BO 4.2 &BO 4.3 , |
| P-LAC-478 | Project / Dissertation |
| | Students Seminars |

# भाग - ३ : महाविद्यालयाचे नियम व विविध उपक्रम

**वरिष्ठ महाविद्यालय शाखानिहाय प्रवेश पद्धत :**

कला, वाणिज्य व विज्ञान शाखेतील प्रथम वर्ष या वर्गासाठी नोंदणी करून गुणवत्तेनुसार प्रवेश दिला जाईल.

**प्रवेशासाठी आवश्यक कागदपत्रे :**

**नोंदणी अर्जासोबत खालील कागदपत्रे जोडावीत :**

१. १२ वी टी.सी.ची सत्यप्रत.
२. १२ वी गुणपत्रिकेची सत्यप्रत.
३. जातीच्या प्रमाणपत्राची सत्यप्रत (मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी)
४. योग्यता प्रमाणपत्राची सत्यप्रत (महाराष्ट्र राज्याबाहेरील विद्यार्थ्यांसाठी).
५. एम. ए., एम. कॉम. व एम. एस्सी. प्रथम वर्षाच्या प्रवेशासाठी पदवी परीक्षेच्या तीनही वर्षाच्या गुणपत्रिकेच्या सत्यप्रती जोडाव्यात.

**अंतिम प्रवेश अर्जासोबत जोडावयाची कागदपत्रे :**

१. १२ वी ची टी.सी. व गुणपत्रकाची सत्यप्रत जोडणे अनिवार्य आहे.
२. १२ वी टी.सी.ची मूळ प्रत व एक सत्यप्रत.
३. १२ वी गुणपत्रक मूळ प्रत व एक सत्यप्रत.
४. जातीच्या प्रमाणपत्राची सत्यप्रत (मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी).
५. शिष्यवृत्ती मंजुरी क्रमांक (मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी).
६. ई.बी.सी. मंजुरी क्रमांक (आर्थिकदृष्ट्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी).
७. स्थलांतर प्रमाणपत्र (मायग्रेशन सर्टिफिकेट) विद्यापीठाबाहेरील विद्यार्थ्यांसाठी.
८. विद्यापीठ योग्यता प्रमाणपत्र (Eligibility Certificate)
९. नुकत्याच काढलेल्या पासपोर्ट साईज फोटोच्या २ प्रती.
१०. मुळ कागदपत्रे गहाळ झाल्यास व विद्यार्थ्यांना मुळ कागदपत्राची झेरॉक्स हवी असल्यास कार्यालयात अतिरिक्त फीस भरावी लागेल.
११. मेडिकल लिव्हचा विचार फक्त परीक्षा देण्याकरीताच केला जाईल. स्वायत्त महाविद्यालयांतर्गत उपस्थितीच्या गुणासाठी त्याचा विचार केला जाणार नाही.

### महाविद्यालयाचे नियम

**उपस्थितीसंबंधी :**

१) दररोज, नियमित आणि जादा तासाला विद्यार्थ्यांच्या उपस्थितीची नोंद घेतली जाते.

२) विद्यार्थ्यांची प्रत्येक विषयाची दरमहा किमान ७५% उपस्थिती अनिवार्य आहे.

३) प्रत्येक विषयात ७५% पेक्षा अधिक उपस्थिती असलेल्या विद्यार्थ्यांना उपस्थितीच्या प्रमाणानुसार कमाल ५ गुण दिले जातील.

४) प्रत्येक महिन्यातील उपस्थिती ७५% पेक्षा कमी असल्यास -
   अ) पालकांना कळविले जाते.
   ब) दंड आकारला जातो.
   क) रेकॉर्ड बुक प्रमाणित केले जात नाही.
   ड) महाविद्यालयामार्फत दिल्या जाणाऱ्या सवलती रद्द केल्या जातात.
   इ) महाविद्यलयीन परीक्षेला बसण्याची परवानगी दिली जात नाही.
   ई) प्रवेश रद्द केला जातो.

४) महाविद्यालयातर्फे सांस्कृतिक कार्यक्रम, क्रीडा, वक्तृत्व व वादविवाद, एन.सी.सी., एन.एस.एस., शैक्षणिक सहली अविष्कार अथवा अन्य कारणासाठी विद्यार्थी महाविद्यालयात अनुपस्थित राहिल्यास प्रभारी प्राध्यापकांच्या स्वाक्षरीसह त्या त्या वेळीच अर्ज कार्यालयात दाखल करणे बंधनकारक राहील.

विद्यार्थी आजारी असल्यास आजारानंतर महाविद्यालयात वैद्यकीय प्रमाणपत्र ताबडबोब दाखल करणे बंधनकारक राहील. तसेच जास्त दिवस आजारी असल्यास पालकाद्वारे महाविद्यालयास पूर्व सूचना देणे आवश्यक आहे.

**अंतर्गत मूल्यांकन परीक्षेसंबंधी :**

१) महाविद्यालयातर्फे घेतल्या जाणाऱ्या अंतर्गत चाचणी परीक्षा व सत्रांत परीक्षा देणे विद्यार्थ्यांसाठी अनिवार्य आहे.

२) परीक्षेत ३०% पेक्षा कमी गुण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना दंड आकारला जातो.

३) परीक्षेत अनुपस्थित राहणाऱ्या विद्यार्थ्यांना दंड आकारला जातो.

**महाविद्यालयाची शिस्त व गणवेशाबाबत :**

१) महाविद्यालय परिसरात विद्यार्थ्यांनी गणवेषासह, गळ्यात ओळखपत्र परिधान करणे अनिवार्य आहे.

२) वर्ग सुरू असताना विद्यार्थ्यांनी महाविद्यालयाच्या प्रांगणात रेंगाळू नये व गोंधळ करू नये.

३) प्रत्येक विद्यार्थ्याने वर्गात व परिसरात शिस्त पाळणे आवश्यक आहे.

३) विद्यार्थ्यांना 'कॉमन ऑफ' घेता येणार नाही.

४) सण, उत्सव, इत्यादिंना सुट्टी नसताना गैरहजर राहिल्यास वेगळा दंड आकारला जाईल.

५) महाविद्यालयाच्या इमारतच्या भिंतीवर, डेस्कवर, फलकावर असभ्य मजकूर लिहू नये किंवा तशा प्रकारची चित्रे काढू नयेत.

६) महाविद्यालयाच्या परिसरात मद्यसेवनास, तंबाखू, पान खाण्यास व विडी, सिगारेट ओढण्यास सक्त बंदी घालण्यात आलेली आहे. या नियमाचे उल्लंघन करणाऱ्याविरुद्ध कडक कारवाई केली जाईल. प्राथमिक शिक्षा म्हणून १००/- रू दंड आकारला जाईल. सदर बाबीची विद्यार्थ्यांकडून पुनरावृत्ती घडल्यास प्रवेश रद्द केला जाईल.

**स्वच्छतेसंबंधी :**

१) प्रत्येक विद्यार्थ्याने आपापल्या परीने महाविद्यालयाचा परीसर अस्वच्छ होणार नाही याची दक्षता घ्यावी.

२) वापरलेले कागद, चिठ्ठ्या, प्लॅस्टिक, खाद्यपदार्थांचे कव्हर/रॅपर इ. प्रांगणात टाकू नयेत. या सर्व टाकऊ वस्तू जवळच्या कचराकुंडीतच टाकाव्यात.

**भ्रमणध्वनी वापरावर बंदी :**

महाविद्यालयाच्या परिसरात भ्रमणध्वनी वापरावर प्रशासनाने निर्बंध आणलेले आहेत. महाविद्यालयात भ्रमणध्वनी वापरणे हे बेशिस्त तसेच नियमभंग समजून भ्रमणध्वनी वापरणाऱ्यावर रु. ५००/- चा दंड आकारण्यात येईल. व भ्रमणध्वनी जप्त केला जाईल.

**रॅगिंग प्रकरणी शिक्षा :**

रॅगिंगबाबत दोषी आढळून आल्यास संबंधितावर खालीलप्रमाणे कारवाई करण्यात येईल :

१) वर्ग प्रवेश बंद करणे, ओळखपत्र रद्द करणे, चालू वर्ग व वसतिगृहातील प्रवेश रद्द करणे.

२) परीक्षेपासून वंचित ठेवणे, संबंधित परीक्षेचे मूल्यमापन थांबविणे व परीक्षेचा निकाल राखून ठेवणे.

३) राज्य, राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय क्रीडासंघ, युवक महोत्सव, विद्यार्थी कल्याण मंडळ व इतर मंडळावरील प्रतिनिधीत्व रद्द करणे.

४) राज्य व केंद्रशासनाची शिष्यवृत्ती, फेलोशिप रोखणे.

५) दोषी विद्यार्थ्याला रोख रु. २५,०००/- पर्यंत दंड आकारणे.

**बि.सू.** : रॅगिंग बाबत सर्वोच्च न्यायालय, राज्य व केंद्रशासनाचे नियम, मार्गदर्शक तत्त्वे व कायद्याचे काटेकोरपणे पालन केले जाईल. याप्रकरणी दोषी विद्यार्थ्यांवर दंडात्मक कार्यवाही करण्यात येईल. त्याकरिता स्वतंत्र ॲन्टी रॅगिंग समिती कार्यरत आहे.

**खालील कृत्यांचा शिस्तभंगात समावेश होतो :**

१) ओळखपत्राशिवाय महाविद्यालयात येणे.

२) गणवेषात न येणे किंवा अपुऱ्या गणवेशात येणे.

३) गटबाजी करणे.

४) गोंधळ घालणे.

५) भांडणे करणे.

६) सामूहिक सुट्टी घेणे.

७) विद्यार्थिनची छेडछाड करणे.

८) कर्मचारी व प्राध्यापकांशी उद्धट वर्तन करणे.

९) प्राध्यापकांचा आज्ञाभंग करणे.

१०) गट करून प्रांगणात एकत्र बसणे किंवा थांबणे.

११) तंबाखू, पान खाणे, भिंतीवर थुंकणे व धुम्रपान करणे.

१२) महाविद्यालयाच्या इमारतीवर, डेस्कवर, फलकावर असभ्य मजकूर लिहिणे व चित्रे काढणे.

१३) वर्ग चालू असतांना व्हरांड्यात रेंगाळणे किंवा वर्गासमोर उभे राहून विक्षिप्त हालचाली करणे इ.

१४) महाविद्यालयाच्या परवानगीशिवाय सहलीस जाणे, परस्पर सहलीचे आयोजन करणे, महाविद्यालयाच्या बाहेर स्नेह-संमेलनासारखे कार्यक्रम आयोजित करणे, वर्गामध्ये वाढदिवस साजरा करणे, महाविद्यालयातील पाण्याच्या नळ तोट्या चालू ठेवणे इ. बेशिस्त वर्तन समजले जाईल.

१५) बेशिस्त वर्तन करणाऱ्या विद्यार्थ्यांच्या पालकांना प्रत्यक्ष भेटून किंवा पत्राने सूचना दिली जाते. त्याशिवाय विद्यार्थ्यांना दंड आकारला जातो. शैक्षणिक सवलती बंद केल्या जातात. परीक्षा फॉर्म भरला जात नाही. प्रवेश रद्द केला जातो. विशिष्टप्रसंगी विद्यार्थ्यांवर पोलीस कारवाई केली जाते.

**७विद्यार्थी परिषद :**

अ) महाराष्ट्र विद्यापीठ कायदा २०१७ प्रमाणे या शैक्षणिक वर्षासाठी विद्यार्थी परिषद गठीत करण्यात येईल.

**'शाहूश्री' पुरस्कार :**

दरवर्षी आपल्या महाविद्यालयातून **'शाहूश्री'** साठी आष्टपैलू विद्यार्थ्याची निवड केली जाते. जो विद्यार्थी महाविद्यालयात नियमित असतो, महाविद्यालयातील विविध उपक्रमांत पुढाकार घेतो, अभ्यासात नेत्रदिपक यश संपादन करतो, तसेच इतर विद्यार्थी, कर्मचारी, प्राध्यापक यांच्याशी सलोख्याने वागतो व सामाजिक बांधिलकी बाळगतो अशा अष्टपैलू विद्यार्थ्याचा महाविद्यालयामार्फत स्नेहसंमेलनात 'शाहूश्री' साठी घोषणा केली जाते गुणगौरव कायक्रमातून त्याचा गौरव केला जातो.

**राष्ट्रीय सेवा योजना :**

महाविद्यालयातील विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक जाणीव, श्रमप्रतिष्ठा व कलागुणांच्या विकासासाठी राष्ट्रीय सेवा योजनेतर्फे कॅम्प आयोजन करणे, शिबिराचे आयोजन इ. विविध उपक्रम राबविले जातात.

**राष्ट्रीय सेवा योजनेतील विविध उपक्रम :**

रक्तदान, झोपडपट्टी सर्वेक्षण, अंध - अपंग मैत्री, नैसर्गिक आपत्तीमध्ये मदत, वर्तमान ज्वलंत प्रश्नावर चर्चासत्र, कलापथक, पथनाट्य, अंधश्रद्धा निर्मुलन इत्यादी.

१) सहभागी विद्यार्थ्यांची संख्या - २५०

२) युवक शिबीर - १२५ विद्यार्थ्यांसाठी, दिवाळीच्या सुट्टीत ग्रामीण भागात ७ दिवसांचे शिबिर आयोजित केले जाते.

३) दोन वर्ष पूर्ण केलेल्या विद्यार्थ्याला प्रमाणपत्र व २ क्रेडिट देण्यात येतील.

४) तिसऱ्या वर्षात कार्यरत असलेल्या विद्यार्थी स्वयंसेवकांपैकी दोन उत्कृष्ट स्वयंसेवकांना पारितोषिके दिली जातात.

**शैक्षणिक सहली :**

महाविद्यालयातर्फे केवळ दिवाळीच्या सुट्टीतच विविध विषयांच्या शैक्षणिक सहलीचे आयोजन केले जाते.

**राजर्षी शाहू व्याख्यानमाला :**

महाविद्यालयातील विद्यार्थी, शिक्षक - शिक्षकेत्तर कर्मचारी आणि नागरिक यांचे प्रबोधन व्हावे, त्यांनी जननिष्ठ विचार करावा, विचारांना चालना मिळावी, यासाठी ही व्याख्यानमाला गेल्या अनेक वर्षापासून चालविण्यात येते. या व्याख्यानमालेत सुमारे ५९ नामांकित वक्त्यांची व्याख्याने झाली आहेत.

**क्रीडा विभाग :**

विद्यार्थी-विद्यार्थिनच्या अंगी खिलाडूवृत्तीचा विकास व्हावा, देशी - विदेशी खेळांची आवड निर्माण व्हावी, आरोग्य संवर्धन व्हावे. यासाठी महाविद्यालयामध्ये क्रीडा विभाग कार्यरत आहे. बैठे खेळ, (इनडोअर मॅचेस), मैदानी खेळ यात महाविद्यालयाच्या क्रीडा संघाने महाविद्यालयीन, आंतर महाविद्यालयीन, विद्यापीठीय व आंतर विद्यापीठीय आणि राज्य पातळीवर नेत्रदीपक यश मिळविले आहे. काही क्रीडा स्पर्धांमध्ये राष्ट्रीय पातळीवरही प्रतिनिधित्व मिळविण्याचा बहुमान संपादित केला आहे. तसेच Boxing सारख्या आंतरराष्ट्रीय खेळाचे प्रशिक्षण येथे दिले जाते. महाविद्यालयामध्ये आंतरराष्ट्रीय दर्जाचे इनडोअर स्टेडीयम व जलतरण तलाव उपलब्ध आहे.

**जिम्नॅशियम :**

महाविद्यालयातील व महाविद्यालयाबाहेरील विद्यार्थ्यांसाठी व विद्यार्थिनींसाठी महाविद्यालयाच्या परिसरात स्वतंत्र सुसज्ज जिम्नॅशियम उपलब्ध आहे.

**हेल्थ केअर व समूपदेशन केंद्र :**

महाविद्यालयात हेल्थ केअर सेंटर अस्तित्वात असून विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी व समूपदेशन नियमितपणे केले जाते.

**व्यवसाय मार्गदर्शन केंद्र :**

शासकीय, निमशासकीय आणि खाजगी संस्था तसेच स्थानिक स्वराज्य संस्था यांच्याकडे निरनिराळ्या प्रकारच्या नोकऱ्यांसाठी उमेदवारांची भरती वेळोवेळी होत असते. ज्या विद्यार्थ्यांना रोजगार, नोकरी यांची गरज आहे, त्यांना मार्गदर्शन करण्यासाठी महाविद्यालयाने स्वतंत्र विभाग निर्माण केला आहे. नोकऱ्यासाठी होणाऱ्या पूर्वपरीक्षा, तोंडी मुलाखती यांची माहिती वेळोवेळी सूचना फलकावर लावण्यात येते. तसेच गरजू विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात येते. ज्यांना स्वयंरोजगाराची गरज आहे. अशा विद्यार्थ्यांसाठी निरनिराळ्या प्रकारची माहिती पुरविली जाते. तसेच सर्वांना संबंधित कार्यालयाच्या अधिकाऱ्याकडून मार्गदर्शन केले जाते.

**प्लेसमेंट सेल :**

विद्यार्थांना रोजगाराभिमुखशिक्षण देण्याच्या दृष्टीने महाविद्यालयाने एक स्वतंत्र सेलची निर्मिती केलेली असून या कामी स्वतंत्र ऑफिसरची नियुक्ती केलेली आहे. त्या अंतर्गत राष्ट्रीय / बहुराष्ट्रीय तसेच खाजगी व सार्वजनिक क्षेत्रातील नामांकित कंपन्याच्या मागणीनुसार लागणाऱ्या पदासाठी अंतिम वर्षाच्या विद्यार्थ्यांची निवड या प्लेसमेंट सेलद्वारे कॅम्पस इन्टव्यूव्ह घेऊन करण्यात येते.

**अॅल्युमनी असोशिएशन :**

महाविद्यालयात अॅल्युमनी असोशिएशन कार्यरत आहे. प्रत्येक शाखेच्या अंतिम वर्षाच्या विद्यार्थ्यांकडून अर्ज भरून घेतला जातो व असोशिएशनचा सदस्य करून घेतले जाते. महाविद्यालयात या असोशिएशनच्या नियमित बैठका घेतल्या जातात.

**शाहू कॅन्टीन :**

महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, शिक्षक, कर्मचारी, विद्यार्थी व विद्यार्थिनीसाठी माफक दरामध्ये कॅन्टनची सुविधा उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे.

**पॅरेंट - टीचर असोशिएशन :**

महाविद्यालयात पॅरेंट-टीचर असोशिएशन अस्तित्वात असून नियमित बैठका घेतल्या जातात.

**रेमेडियल कोचिंग :**

यु.जी.सी.च्या मार्गदर्शक तत्त्वानुसार मागासवर्गीय व अल्पसंख्यांक या प्रवर्गातील अभ्यासात कमी पडणाऱ्या व अनुत्तीर्ण विद्यार्थ्यांकरिता महाविद्यालयात रेमेडियल कोचिंगची स्वतंत्र व्यवस्था करण्यात आलेली आहे.

**एस.सी./एस.टी सेल :**

केंद्रशासनाच्या धोरणाला अनुसरून मागासवर्गीय विद्यार्थ्यांचे प्रश्न, अडी-अडचणी सोडवण्यासाठी स्वतंत्र्य एस.सी.एस.टी सेलची स्थापना करण्यात आलेली आहे.

**राजर्षी शाहू प्रबोधिनी :**

राजर्षी शाहू प्रबोधिनी अंतर्गत विविध स्पर्धा परीक्षांचे मार्गदर्शन वर्ग चालविले जातात. या वर्गाकरिता गरीब व होतकरू विद्यार्थ्यांना फीमध्ये सवलत दिली जाते. या वर्गांमध्ये महाराष्ट्र लोकसेवा आयोगाद्वारे वर्ग - १, वर्ग - २, व वर्ग - ३ पदांसाठी घेण्यात येणाऱ्या सर्व स्पर्धा परीक्षांचे वर्ग घेतले जातात. यामध्ये उपजिल्हाधिकारी, पोलीस उप-अधिक्षक, कक्ष अधिकारी, तहसीलदार, गटविकास अधिकारी, विक्रीकर अधीकारी, कक्ष अधिकारी, विशेष लेखा परीक्षक, समाजकल्याण अधिकारी, वित्त व लेखा अधिकारी, नगरपालिका मुख्याधिकारी, पोलीस उपनिरीक्षक, विक्रीकर निरीक्षक, मंत्रालय सहाय्यक या पदांचा समावेश होतो. या करीता एक स्वतंत्र बी.ए. (एम.पी.एस.सी. स्पेशल बॅच) ची सुरूवात करण्यात आलेली आहे.

**सांस्कृतिक मंडळ :**

विद्यार्थ्यांच्या अंगभूत कलागुणांना वाव देण्याकरिता महाविद्यालयाचे सांस्कृतिक मंडळ कार्यरत आहे. महाराष्ट्राच्या लोककला, लोकनृत्य, लोकसंगीत, शास्त्रीय व सुगम गायन, शास्त्रीय वाद्य, पाश्चात्त्य संगीत, नृत्य, नाटय चित्रकला, रांगोळी, मृदमूर्तीकला, भारूड, गोंधळ, वक्तृत्व, वादविवाद, काव्यवाचन अशा विविध कला प्रकाराबाबत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन व प्रशिक्षणाच्या माध्यमातून या कलाप्रकारात विकसित केले जाते. विद्यापिठीय युवक महोत्सव, विभागीय व राष्ट्रीय युवक महोत्सव, राज्यस्तरीय नृत्य व नाटय स्पर्धा, विविध स्तरीय वक्तृत्व व वादविवाद स्पर्धा या व अशा स्पर्धांकरिता विद्यार्थ्यांमध्ये स्पर्धात्मक पात्रता विकसित करून स्पर्धा जिंकण्याकरिता त्यांना प्रोत्साहन दिले जाते. महाविद्यालयात आयोजित केल्या जाणाऱ्या विविध स्पर्धा व वार्षिक स्नेहसंमेलनातून विद्यार्थ्यांच्या कलाविष्काराला संधी देण्यात येते.

**वाङ्मय मंडळ :**

कोणत्याही संस्कृतीची ओळख त्या त्या भाषेतील महत्त्वाच्या वैचारिक आणि ललित वाङ्मयावरून होऊ शकते. प्रत्येक मनुष्य हा कलावंत किंवा रसिक तरी नक्कीच असतो. महाविद्यालयातील वाङ्मय मंडळ कविता, कथा, वैचारिक साहित्य इत्यादी लेखनगुणांच्या विकासासाठी प्रयत्न करते. महाविद्यालयात काव्यवाचन / गायन आणि कथाकथनाचे कार्यक्रम आणि स्पर्धा होत असतात. या मंडळामार्फत एक हस्तलिखित भित्तीपत्रक चालविण्यात येते.

या मंडळामार्फत डॉ. बाबासाहेब आंबेडकर आंतरमहाविद्यालयीन निबंध स्पर्धा आयोजित केली जाते. सद्यकालीन प्रश्न, काही सैद्धांतिक प्रश्नावर विषय देऊन स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाशी संलग्न असलेल्या महाविद्यालयीन विद्यार्थ्यांकडून निबंध मागविले जातात आणि गुणानुक्रमे पहिल्या तीन निबंधांना पारितोषिके दिली जातात.

**वाणिज्य मंडळ :**

उत्पादन, विनिमय, वितरण, नफा - तोटा, नियोजन, अंदाजपत्रके, नोंदी या गोष्टना आयुष्यात महत्त्व असते. त्यामुळे जीवनाला शिस्त येते. देशाचे अंदाजपत्रक आणि नियोजन असते तसेच सर्व सामाजिक संस्था आणि कुटुंबाचेही नियोजन असते. विद्यार्थ्यांनी वाणिज्य विषयांचा अभ्यास करून त्यांचा वैयक्तिक आणि सामाजिक जीवनात उपयोग करावा या उद्देशाने हे मंडळ चालविले जाते. या मंडळामार्फत संबंधित विषयातील नामवंत अभ्यासकांची व्याख्याने महाविद्यालयात होतात. विद्यापीठ व जिल्हा पातळीवर **कॉमर्स आयडॉल** स्पर्धेचे आयोजन केले जाते.

**सामाजिकशास्त्र मंडळ :**

मनुष्य हा समाजशील प्राणी आहे. त्याचा एकाच वेळी समाज, धर्म, अर्थकारण, राजकारण, संस्कृती यांच्याशी संबंध येतो. जीवनाची ही सर्व अंगे एकमेकांशी संबंधित असतात. या मंडळाच्या

वतीने विद्यार्थ्यांना सामाजिक शास्त्रांचा परिचय करून देणे, जीवनातील स्थान समजून देणे, हे या मंडळाचे उद्दिष्ट आहे. विद्यार्थ्यांनी स्वतः आपल्या विषयावर चिंतन करणे, निबंध लिहिणे, नामवंत अभ्यासक तज्ञांची व्याख्याने आयोजित करणे इत्यादी उपक्रम हे मंडळ राबविते. अभ्यासक्रमांतर्गत सहलीचे आयोजनही करण्यात येते.

**विज्ञान मंडळ :**

सकल विश्वाचं कल्याण करण्याचं उद्दिष्ट घेऊन, तर्काला प्रायोगिकतेची जोड देऊन विज्ञानाने चौफेर प्रगती केली आहे. या प्रगतीचं क्षितिज रुंदावत आहे. या वैज्ञानिक प्रगतीमध्ये महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी भरीव योगदान द्यावे, याकरिता विद्यार्थ्यांची जिज्ञासा व वैज्ञानिक दृष्टीला विवेकाचे अधिष्ठान देण्याचे काम करण्याकरिता महाविद्यालयाच्या विज्ञान मंडळाची निर्मिती करण्यात आली आहे. याची पूर्तता करण्याकरिता वैज्ञानिक तत्त्वांच्या अभ्यासकांच्या सेमीनार्सचे आयोजन, विज्ञान प्रदर्शन, विद्यार्थ्यांना देण्यात आलेल्या प्रोजेक्टसचे सादरीकरणे, विद्यार्थ्यांच्या मनात स्रवनाऱ्या विविध संकल्पना मांडण्याकरिता भित्तीपत्रकांचे प्रकाशन केले जाते. या विज्ञान मंडळा व्यतिरिक्त विभागनिहाय विविध विज्ञान विषयक एकूण ६ अभ्यास मंडळे महाविद्यालयात कार्यरत आहेत. या विविध अभ्यास मंडळाद्वारे विज्ञान विषयक व्याख्याने व इतर उपक्रम आयोजित केले जातात. विद्यापीठ व राज्य पातळीवर आयोजित होणाऱ्या आविष्कार या वैज्ञानिक उपक्रमांत भाग घेण्याकरिता विद्यार्थ्यांना मार्गदर्शन व प्रोत्साहन दिले जाते.

**अविष्कार - राज्यस्तरीय संशोधन प्रकल्प स्पर्धा :**

अविष्कार ही अंतरविद्यापीठीय संशोधन प्रकल्प स्पर्धा असून ती पदवी, पदव्युत्तर पदवी, एम.फिल व पी.एच.डी करणाऱ्या विद्यार्थ्यांकरिता आहे. ही स्पर्धा इ.स.२००६ पासुन महाराष्ट्राचे तत्कालिन राज्यपाल श्री.एस.एम. कृष्णा यांच्या सुचनेनुसार आयोजित करण्यात येत असून ती 'अश्वमेध' व 'इंद्रधनुष्य' या राज्य व राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धा प्रमाणे आहे.

**अविष्कारची मुख्य उद्दिष्टे :**

* महाविद्यालयीन व विद्यापिठीय विद्यार्थ्यांमध्ये संशोधन वृत्ती वृद्धिंगत करणे.
* विद्यार्थ्यांच्या मनातील नाविन्यपुर्ण संकल्पनांना प्रोत्साहित करणे.
* विद्यार्थ्यांना त्यांची बुद्धिमत्ता व शैक्षणिक गुणवत्ता प्रकट करण्याची संधी उपलब्ध करून देणे.
* विद्यार्थ्यांचा औद्योगिक, संशोधन व विकास संस्थेशी सुसंवाद घडवून आणणे.

**सहभागाचे निकष :**

1) पदवी, पदव्युत्तर पदवी, एम.फिल, पी.एच.डी विद्यार्थी व शिक्षक यांची नोंदणी स्वतंत्र श्रेणीतुन करता येते.
2) कला, विज्ञान व वाणिज्य शाखेतील विद्यार्थी स्वतंत्रपणे सहभाग नोंदवू शकतात.
3) सहभाग घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांची वयोमर्यादा खालील प्रमाणे राहिल.

| श्रेणी | वयोमर्यादा |
|---|---|
| पदवी | :- २५ वर्षापर्यंत |
| पदव्युत्तर पदवी | :-३० वर्षापर्यंत |
| एम.फिल, पी.एच.डी व शिक्षक | :- वयोमर्यादा नाही |

**महाविद्यालयीन वार्षिकांक :**

महाविद्यालयातील अनेक विद्यार्थ्यांमध्ये सृजनक्षमता असते. त्यांच्या सृजनशीलतेला चालना देण्यासाठी, रसग्रहण, आकलन, समीक्षनदृष्टी यावी, मर्मज्ञता वाढावी यासाठी महाविद्यालयामार्फत **'शब्दगंध'** वार्षिकांक काढण्यात येतो. यामध्ये कथा, कविता, वैचारिक व विज्ञानविषयक लेख, समीक्षा इत्यादी लेखनाला प्राधान्य देण्यात येते.

**राष्ट्रीय छात्र सेना (मुले) :**

प्रवेश क्षमता : ५४

**राष्ट्रीय छात्र सेना (मुली) :**

प्रवेश क्षमता : ५४

**राष्ट्रीय छात्र सेना भविष्यातील संधी (मुले / मुली) :**

१) 'सी प्रमाणपत्र' 'बी' ग्रेडमध्ये उत्तीर्ण होणाऱ्या कॅडेटस्ना सैन्यामध्ये अधिकारी पदासाठी सरळ मुलाखतीसाठी जाता येते. सी. डी. एस. परीक्षेची गरज नाही.
२) सतत दोन वर्षे प्रशिक्षण घेणाऱ्या आणि एका कॅम्पमध्ये सहभाग घेतलेल्या तसेच ७५% हजेरी असणाऱ्या विद्यार्थ्यांना पदवी परीक्षेच्या अंतिम वर्षाच्या गुणात ०५ गुणाची वाढ.
३) विविध स्कॉलरशिपस्
४) युथ एक्सचेंज प्रोग्रॅम (YEP) अंतर्गत बाहेर देशास जाण्याची संधी.
५) आय.पी.एस. आणि पी.एस.आय. निवडीच्या वेळी प्राधान्य.
६) राष्ट्रीय व राज्य पातळीवरील विविध कॅम्पमध्ये सहभागी होता येते.
७) पदवी स्तरावर एन.सी.सी. इंटरडिसीप्लीनरी इलेक्टिव हा विषय सुरू करण्यात आलेला आहे.

**यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ नाशिक अभ्यासकेंद्र :**

मुक्त विद्यापीठाचे अधिकृत अभ्यासकेंद्र म्हणून जून १९९० मध्ये या महाविद्यालयास मान्यता मिळालेली आहे. बी.ए. व बी.कॉमच्या अभ्यासक्रमाशिवाय एम.ए. मराठी, हिंदी, इंग्रजी, व एम.कॉम या अभ्यासक्रमासाठी विद्यार्थ्यांना प्रवेश दिला जातो.

कौस्तुभ दिवेगावकर हा, या केंद्राचा विद्यार्थी यु.पी.एस.सी. परीक्षेत महाराष्ट्रातून सर्वप्रथम आलेला आहे. आमचे केंद्र महाराष्ट्रात विद्यार्थी संख्येने सर्वात मोठे केंद्र असून मुक्त विद्यापीठाकडून उत्कृष्ठ केंद्र व संस्था म्हणून गौरव झालेला आहे.

**मुलांचे वसतिगृह :**

सन २००० पासुन महाविद्यालयाने विद्यार्थी वसतिगृह सुरू केले आहे. या वसतिगृहात गरीब व होतकरू अशा ८० विद्यार्थ्यांना प्रवेश दिला जातो. प्रवेश मिळालेल्या विद्यार्थ्यांना वसतिगृहाचे नियम बंधनकारक राहतील.

**मुलचे वसतिगृह :**

महाविद्यालयाच्या परिसरात कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थिनना वसतिगृहात राहण्याची सोय आहे.

या वसतिगृहात १२० विद्यार्थिनना गुणवत्तेनुसार प्रवेश दिला जातो. त्यांची भोजन व्यवस्था वसतिगृहातच असते. प्रवेश मिळविलेल्या विद्यार्थिनना वसतिगृहाचे नियम बंधनकारक राहतील. कनिष्ठ विज्ञान महाविद्यालयाच्या संकुलात इतर ५ वसतिगृहे आहेत.

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर वाचन स्पर्धा :**

महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या मनामध्ये अभ्यासेत्तर ग्रंथांच्या वाचनाची आवड निर्माण व्हावी, त्यांच्या वाचनाला निश्चित दिशा व चिंतनाला वैचारिक अधिष्ठाण प्राप्त व्हावे या उद्देशाने ही स्पर्धा आयोजित करण्यात येते. जुलै ते डिसेंबर या कालावधीत केले जाणारे वाचन या स्पर्धेसाठी ग्राह्य मानण्यात येईल. संबंधित ग्रंथांच्या वाचनाचा मुद्देसुद व थोडक्यात सारांश लेखी स्वरूपात, स्पर्धा समितीकडे द्यावा लागेल. गुणानुक्रमे पहिल्या दहा विद्यार्थ्यांची मौखिक चाचणी घेण्यात येईल व त्यासाठी वेगळे गुण देण्यात येतील. प्रथम, द्वितीय व तृतीय येणाऱ्या विद्यार्थ्यांना अनुक्रमे ५०० रु., ३०० रु. व २०० रु.चे पारितोषिक व विशेष प्रमाणपत्र देण्यात येईल. या योजनेत भाग घेणाऱ्या वरिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना नोंदणी करावी लागेल.

**महात्मा फुले लेखन स्पर्धा :**

विद्यार्थ्यांच्या ललित, वैचारिक, सामाजिक व वर्तमान परिस्थितीवरील केल्या जाणाऱ्या लेखनाला दर्जा प्राप्त व्हावा आणि त्यांच्या लेखन कौशल्याला वाव मिळावा म्हणून या स्पर्धेचे आयोजन केले जाईल. जुलै ते डिसेंबर या कालावधीत विविध वृत्तपत्र, मासिके तसेच नियतकालिके इत्यादीमधून प्रकाशित झालेल्या लेखनास या स्पर्धेसाठी ग्राह्य मानण्यात येईल. विविध पातळीवरील निबंध, काव्य, कथा व इतर स्पर्धेतील लेखांना देखील गुणदान करण्यात येईल. गुणानुक्रमे पहिल्या दहा विद्यार्थ्यांची मौखिक चाचणी घेण्यात येईल व त्यासाठी वेगळे गुण देण्यात येतील. प्रथम, द्वितीय व तृतीय येणाऱ्या विद्यार्थ्यांना अनुक्रमे ५०० रु., ३०० रु. व २०० रु.चे पारितोषिक तसेच विशेष प्रमाणपत्र देण्यात येईल.

**प्राचार्य अनिरुद्ध जाधव कमवा व शिका योजना :**

शिक्षण क्षेत्रातील दीपस्तंभ असलेल्या कर्मवीर भाऊराव पाटलांनी मोठ्या ध्येयवादाने ग्रामीण भागातून शिक्षणाचा प्रसार व प्रचार करण्यासाठी कमवा व शिका योजनेचा मोठ्या आग्रहाने पुरस्कार केला होता. हाच आदर्श डोळ्यांपुढे ठेवून या महाविद्यालयामध्ये '**प्राचार्य अनिरुद्ध जाधव कमवा व शिका योजना**' राबविण्यात येते. कष्टाळू, होतकरू, प्रामाणिक, गरीब व गरजू विद्यार्थ्यांना स्वावलंबी वृत्तीने आपले स्वतःचे शिक्षण पूर्ण करता यावे यासाठी त्यांच्या परिश्रमाची योग्यता पाहून त्यांना विविध प्रकारचे काम उपलब्ध करून दिले जाते.

**कर्मयोगी ॲड. नारायणराव पाटील विद्यार्थी साहाय्य निधी :**

२००७-२००८ या शैक्षणिक वर्षापासून महाविद्यालयाच्या कला शाखेतील विविध वर्गात प्रवेश घेतलेल्या ग्रामीण, गरीब, होतकरू व आर्थिकदृष्ट्या कमकुवत विद्यार्थ्यांना आपले स्वतःचे शिक्षण यशस्वीरित्या पूर्ण करता यावे यासाठी कर्मयोगी ॲड. नारायणराव पाटील विद्यार्थी साहाय्य निधीतून शिष्यवृत्ती योजना राबविण्यात येत आहे.

